रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ ◆ अंक २०१
www.ramprahar.com

◆शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## भारताच्या युवा शिलेदारांनी अंडर-१९ वर्ल्डकप जिंकला



**हरारे (झिम्बाब्वे) :** मुंबईकर आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत इतिहास घडवला आहे. झिम्बाब्वेतील हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम सामन्याचा थरार रंगला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीने १७५ धावांची वादळी खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने पहिल्या डावात ४११ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला, पण त्यांचा डाव ३११ धावांमध्ये संपुष्टात आणून भारतीय संघाने हा सामना १०० धावांनी जिंकला आणि सहाव्यांदा जेतेपदाला गवसणी घातली आहे.

### अंतरंग

एसटी बसेस फेऱ्यांचा वक्तशीरपणा वाढवा/२
विकासकामांच्या जोरावर महायुतीचा विजय नक्की!/६
राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंगमध्ये रोनक जितेकरला ‘सुवर्ण’/८

# पनवेलला मिळणार पहिला आगरी महापौर; तर क्रांतिवीरांच्या भूमीतील लेक होणार उपमहापौर!

## नितीन पाटील, प्रमिला पाटील यांचे अर्ज दाखल







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौरपदाकरिता होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजप महायुतीकडून शुक्रवारी (दि.६) अधिकृतपणे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. महापौरपदासाठी नितीन जयराम पाटील, तर उपमहापौरपदासाठी प्रमिला रविनाथ पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज महापालिका कार्यालयात नगरसचिव नानासाहेब कामठे यांच्याकडे सादर केला. नितीन पाटील यांच्या निवडीमुळे आगरी समाजाचा पहिला महापौर लाभणार असून ही बाब समस्त आगरी समाज आणि पनवेलसाठी ऐतिहासिक ठरली आहे.

पनवेल महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक भाजप महायुतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली लढवली. या निवडणुकीत भाजपने ५५, शिवसेनेने दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागांवर विजय मिळवत एकूण ५९ जागांसह महापालिकेवर पुन्हा एकदा भाजप महायुतीची भक्कम सत्ता प्रस्थापित केली आहे.

> *नितीन पाटील आणि प्रमिला पाटील यांना समाजकार्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचा फायदा पनवेल महापालिकेला होणार आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्याबरोबरच जनतेला अपेक्षित असा महापालिकेचा सर्वांगीण विकास ते करतील. प्रदेश कार्यकारिणीने त्यांच्या निवडीबद्दल चांगला निर्णय घेतला. आमदार प्रशांत ठाकूर आणि सर्व नेत्यांचे सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे धोरण आहे. त्यामुळे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय महायुतीचा कायम चांगला समन्वय आहे.*
>
> **-परेश ठाकूर, माजी सभागृह नेते, पनवेल महानगरपालिका**

येत्या १० फेब्रुवारीला महापौर व उपमहापौरपदासाठी निवडणूक होणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी भाजप महायुतीकडून अर्ज दाखल करण्यात आले. महापौर व उपमहापौरपदासाठी प्रदेशाकडे नावे सुचवण्यात आली. त्यांच्या मान्यतेने ही निवड करण्यात आली असून महापौर व उपमहापौरपदासाठी सव्वा वर्षाचा फॉर्म्युला ठरवण्यात आला आहे.

अर्ज दाखल करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, आरपीआय पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी त्यांनी आणि तत्पूर्वी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्यासह महायुतीमधील नेत्यांनी नितीन पाटील व प्रमिला पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालकरिता शुभेच्छा दिल्या.

पनवेल तालुक्यातील कासारभाट हे नितीन पाटील यांचे मूळ गाव. त्यांनी यापूर्वी दोन वेळा नगरसेवक म्हणून जबाबदारीने काम केले आहे. सभागृहातील त्यांचा अनुभव, विषयांची सखोल मांडणी आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यामुळे ते नेहमीच चर्चेत राहिले आहेत. त्यांचा जनसंपर्क व्यापक व मजबूत असून नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस म्हणून त्यांनी संघटनात्मक पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पनवेल विधानसभा निवडणुकीत त्यांनी निवडणूक प्रमुख म्हणून केलेले नियोजन, समन्वय आणि नेतृत्व पक्षाच्या यशात महत्त्वाचे ठरले आहे. सामाजिक कार्याची आवड असल्याने ते सुरुवातीपासूनच विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय आहेत. **(पान २ वर..)**



## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी आज मतदान

■ रायगड जिल्हा प्रशासन सज्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी (दि. ७) मतदान होणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून तयारी पूर्ण झाली आहे.

जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३ उमेदवार, तर १५ पंचायत समित्यांच्या ११८ जागांकरिता ३२९ उमेदवार रिंगणात आहेत. जिल्ह्यातील दोन हजार ३२३ मतदान केंद्रांवर १७ लाख ३८१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल.

मतदान प्रक्रियेसाठी जवळपास १६ हजार १२१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. शिवाय १६०० राखीव कर्मचारी आहेत. शुक्रवारी कर्मचारी मतदान साहित्य घेऊन मतदान केंद्रांवर रवाना झाले. मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी प्रत्येक केंद्रावर एक निवडणूक अधिकारी तसेच तीन कर्मचारी व एक शिपाई नेमण्यात आला आहे. याव्यतिरिक्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येक केंद्रांवर पोलीस कर्मचारी तैनात राहणार आहेत. मतदान प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करण्यात आली असून ही पथके मतदान केंद्रांना भेट देऊन पाहणी करतील.

या निवडणुकीसाठी १७ लाख ३८१ मतदार आहेत. त्यात महिला मतदारांची संख्या अधिक आहे. आठ लाख ५४ हजार नऊ महिला मतदार आणि आठ लाख ४६ हजार ३४७ पुरुष मतदार मतदानाचा हक्क बजावतील. मतदानासाठी २ हजार ३२३ ईव्हीएम वापरले जाणार आहेत.

**तालुकावार मतदान केंद्र**

पनवेल ३४६, कर्जत २२०, खालापूर १४४, सुधागड ७५, पेण १९०, उरण १३५, अलिबाग २६१, मुरूड ८१, रोहा १९४, तळा ५२, माणगाव २०६, म्हसळा ६९, श्रीवर्धन ८०, महाड २०३, पोलादपूर ६७.

## निवडक

### पाकिस्तानमध्ये मशिदीत भीषण स्फोट, ३१ जण ठार

**इस्लामाबाद :** पाकिस्तानची राजधानी असलेल्या इस्लामाबाद येथील एका इमाम बारगाहमध्ये शुक्रवारी (दि.६) आत्मघाती स्फोट झाला. या स्फोटात ३१ जणांचा मृत्यू झाला असून १००हून अधिक लोक जखमी झाले आहेत. एका आत्मघातकी हल्लेखोराने आत प्रवेश केल्यानंतर गेटजवळ स्वतःला उडवून दिले. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

### आरएसएसच्या काश्मीर ते कन्याकुमारी ध्वज यात्रेला प्रारंभ

**श्रीनगर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शुक्रवार (दि. ६)पासून काश्मीर ते कन्याकुमारी ध्वज यात्रेला सुरुवात केली. संघाच्या १००व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीनगरच्या ऐतिहासिक लाल चौकातून या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला आहे. शतक : संघाची १०० वर्षे या चित्रपटाचा संदेश देशभर पोहचवणे आणि आरएसएसच्या सांस्कृतिक, सामाजिक व वैचारिक योगदागाची माहिती देणे हा या यात्रेचा उद्देश आहे.

## स्व. अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण थांबवा -मुख्यमंत्री



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघाती निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा वाद निरर्थक, चुकीचा आणि खालच्या पातळीचा असल्याचे सांगत याबाबत सुरू असलेले राजकारण तत्काळ थांबवावे, असे त्यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर काही घटकांकडून विविध तर्कवितर्क मांडले जात असून या दु:खद घटनेतून राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. जनतेत लोकप्रिय असलेले आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे राजकारण करणे अत्यंत चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक जण या घटनेला स्वतःच्या राजकीय चष्म्यातून पाहण्याचा प्रयत्न करत असून ही मानसिकता धोकादायक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता. या घटनेनंतर काही तासांतच त्यांची पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याने नव्या चर्चांना तोंड फुटले, मात्र या सर्व घडामोडींना अनावश्यक राजकीय रंग देणे अयोग्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. अशा दु:खद प्रसंगी संयम राखणे, संवेदनशीलता दाखवणे आणि कुटुंबियांच्या भावनांचा आदर करणे हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

## ई-केवायसीसाठी लाडक्या बहिणींना ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्या लाडक्या बहिणींची ई-केवायसी करणे बाकी आहे तसेच ज्यांनी ती पूर्ण केल्यानंतरही त्यांना योजनेचा लाभ मिळला नाही अशा लाभार्थी महिलांच्या अडचणी सोडवल्या जाणार आहेत. महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी यासाठीची मुदत वाढवली जात असल्याची घोषणा केली आहे.

आता ३१ मार्चपर्यंत ई-केवायसीमध्ये दुरूस्ती करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा हीच महिला व बालविकास विभागाची प्रामाणिक भूमिका आहे. म्हणूनच ज्या लाडक्या बहिणींच्या ई-केवायसी प्रक्रियेत काही चूक झाली आहे, त्यांनी मुदतीपूर्वी दुरूस्ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मुख्य निवडणूक आयुक्तांचा रायगडात दौरा

■ मतदान, मतमोजणी केंद्रांसह स्ट्राँग रूमची केली पाहणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या निवडणुकीसाठीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी शुक्रवारी (दि. ६) विविध मतदान केंद्रांसह मतमोजणी केंद्रांना भेट देऊन पाहणी केली आणि तयारीचा आढावा घेतला.

मुख्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा झिराड, वरसोली, सेंट मेरी हायस्कूल तसेच नेहुली येथील मतमोजणी केंद्र, साहित्य वितरण केंद्र आणि स्ट्राँग रूमची पाहणी केली. त्यांच्यासमवेत जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आँचल दलाल, सामान्य प्रशासन उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, अलिबागचे निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मतदान प्रक्रियेसाठी यंत्रणा पूर्णतः सज्ज असून प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, प्रथमोपचार किट, पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी बैठक व्यवस्था आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व तांत्रिक बाबींचीही पूर्तता करण्यात आली असल्याची माहिती या वेळी देण्यात आली.

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निःपक्ष, निकोप व भयमुक्त वातावरणात पार पडेल, असा विश्वास व्यक्त करत मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन मुख्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी केले.

## आजपासून टी-२० वर्ल्डकपचा ‘रन’संग्राम

### पहिल्या दिवशी भारताचा सामना अमेरिका संघाशी



**मुंबई : प्रतिनिधी**

बहुप्रतिक्षित टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला शनिवार (दि. ७) पासून सुरुवात होत आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली हा वर्ल्डकप खेळवला जाणार आहे. गजविजेत्या टीम इंडियासमोर आपले जेतेपद राखण्याचे मोठे आव्हान असेल. भारतीय संघ पहिल्याच दिवशी आपल्या मोहिमेला अमेरिकाविरुद्धच्या सामन्याने सुरुवात करणार आहे.

वर्ल्डकप स्पर्धेत एकूण २० संघ भिडताना दिसतील. या सर्व संघांना एकूण चार गटांमध्ये विभागण्यात आले आहे. भारतीय संघ अ गटात असून कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली स्पर्धेत खेळणार आहे. आतापर्यंत सूर्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने टी-२० क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. रोहित शर्माने २०२४मध्ये टी-२० विश्वचषक जेतेपद जिंकल्यानंतर या फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली. त्यानंतर सूर्यकुमारकडे टी-२० संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने एकही टी-२० मालिका गमावलेली नाही. भारतीय संघाने टी-२० क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केल्याने टी-२० विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद पटकावण्यासाठी भारतीय संघ फेव्हरेट मानला जात आहे.

भारतीय संघाचा टी-२० विश्वचषकातील पहिला सामना अमेरिका संघाविरूद्ध होणार आहे. हा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर ७ फेब्रुवारीला संध्याकाळी ७ वाजल्यापासून खेळवला जाईल. वर्ल्डकपमधील सर्व सामने स्टार स्पोर्ट्स चॅनेलवर, तर मोबाईलवर जिओ हॉटस्टार ॲपवर लाईव्ह पाहता येणार आहेत.

## नवीन पनवेलमधील आगग्रस्त कुटुंबांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून आर्थिक मदत

■ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केली घटनास्थळी पाहणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर १/एस येथील गणेश नगर झोपडपट्टी परिसरात मंगळवारी दुपारी अचानक आग लागून घरे जळून खाक झाली. त्यामुळे तेथे राहणाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या आगग्रस्त सात कुटुंबांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी आर्थिक मदत केली आहे. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते ही मदत शुक्रवारी (दि. ६) सुपूर्द करण्यात आली.

गणेश नगर झोपडपट्टी परिसरात मंगळवारी दुपारी आग लागली होती. घटनास्थळी दोन छोट्या व दोन मोठ्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाला, तर सहा सिलिंडर सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. अग्निशमन दलाने सुमारे दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर ही आग विझवली. या आगीत सुदैवाने जीवित हानी झाली नाही, पण घरे जळून मोठे नुकसान झाले आहे.

या घटनेची दखल घेत संवेदनशील आमदार प्रशांत ठाकूर यांनी आगग्रस्त सात कुटुंबांना आर्थिक मदत केली आहे. माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी संबंधित परिसराची बुधवारी पाहणी केली व त्यानंतर मदत सुपूर्द केली. या वेळी नगरसेवक प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, नगरसेविका कविता चौतमोल, राजेश्री वावेकर आदी उपस्थित होते. या मदतीमुळे नुकसानग्रस्त कुटुंबांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

## निवडक

### लाखोंची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल :** ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करून चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून ५६ लाख २० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. संजय श्रीवास्तव हे सेवानिवृत्त असून, त्यांनी त्यांच्या व्हॉट्सॲपवर एक वेब लिंक दिसली. त्यांनी या लिंकवर क्लिक केल्याने ते या ग्रुपमध्ये जोडले गेल्याने त्यांनी ऑनलाइन पैसे पाठवण्यास सुरुवात करून शेअर्स खरेदी विक्री केली. गुंतवणूक झालेला नफा वेबसाईटवर दिसत होता. त्यावर त्यांना शेअर्समध्ये गुंतवणूक आणि होणारा फायदा दर्शवून वेगवेगळ्या बँक खात्यांवर थोडे थोडे करून ५६ लाख २० हजार रुपये पाठवल्यानंतर झालेला नफा एक कोटी ५० लाख इतका दिसत होता. रक्कम काढण्यासाठी प्रोसेस केली असता विनंती अमान्य करण्यात आली आणि टॅक्स भरावा लागेल, असे सांगितले आणि पुन्हा पैशाची मागणी केली. फसवणूकीचे लक्षात आल्यानंतर त्यांनी गुन्हा दाखल केला.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे नाव संजय राजवाडीया पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही वय अंदाजे ४५ वर्षे डोक्याचे केस व दाढी मिशीचे केस काळे पांढरे असुन छातीवर उजव्या बाजुला गोंधलेले अस्पष्ठ चिन्ह व जुन्या जखमाचे वण्र दिसत आहे. अंगात निळा हाफ बाहयाचा शर्ट व पांढरी चॉकलेटी लुंगी घातलेली आहे. या व्यक्तीबाबत माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे येथे अथवा सहा. पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर ९११७९६६५५५ यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### १० फेब्रुवारीला पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या वेळी विभागीय पेन्शन अदालत मंगळवार,१० फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. या अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. या प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. पेन्शन धारकांनी या अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी प्रश्न उपस्थित करावे, असे कोकण विभाग तहसिलदार (सामान्य प्रशासन) गजानन धुमाळ यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### बालनाथ मोकल सेवानिवृत्त



**अलिबाग :** तालुक्यातील मांडव खार येथील रहिवासी असलेले बालनाथ मोकल हे मुंबई पोलीस दलात १२ फेब्रुवारी १९९६ रोजी रुजू झाले व ३१ डिसेंबर २०२५ रोजी आपली सेवा करून पोलीस उपनिरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झाले पोलीस दलातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल वरिष्ठ पोलीस अधिकारी मुंबई यांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. बालनाथ मोकल यांचे क्रीडा क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे विद्युत मांडव खार या संघाने कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष पद बालनाथ मोकल यांना देऊन त्यांचा गौरव केला तसेच मांडव गावातील ग्रामस्थ व प्रतिष्ठित मंडळी व खारेपाटातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# एसटी बसेस फेऱ्यांचा वक्तशीरपणा वाढवा -परिवहनमंत्री प्रताप सरनाईक



**मुंबई : प्रतिनिधी**

बसेस वेळेवर धावल्या तरच उत्पन्नाची चाके वेगाने फिरतील, असे परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मंत्रालयातील दालनात आयोजित उत्पन्नवाढ आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे. किफायतशीर दर, सुरक्षित प्रवास आणि शासनाच्या विविध सवलतींमुळे प्रवाशांचा ओघ वाढत असताना सेवेत वक्तशीरपणा नसेल तर ही वाढ टिकणार नाही. त्याचबरोबर, प्रवाशांना ताटकळत ठेवणे म्हणजे त्यांना पर्याय शोधायला भाग पाडणे आहे.

दैनंदिन प्रवासात बसेस उशिरा सुटणे, रस्त्यात बंद पडणे किंवा अचानक फेऱ्या रद्द होणे, अशा तक्रारी असतात. यासाठी आगार पातळीवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करून प्रत्येक फेरी नियोजित वेळी सुटेल याची खात्री करावी.

प्रत्येक वेळेवर सुटणारी बस म्हणजे वाढत्या उत्पन्नाकडे जाणारे एक पाऊल आहे. वक्तशीरपणाचा थेट संबंध महसुलाशी आहे. वारंवार होणाऱ्या उशिरामुळे हक्काचा प्रवासी खाजगी पर्यायांकडे वळतो, ही बाब गंभीर असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

वक्तशीरपणा हीच एसटीची ओळख ठरली पाहिजे, यादृष्टीने एसटी प्रशासनाने सज्ज होण्याचे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

प्रवाशांचा विश्वास जपणारी, वेळेवर धावणारी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होणारी एसटी, हाच पुढील वाटचालीचा मंत्र असल्याचेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## मोबाईलचा ॲक्सेस घेऊन केली फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोबाईलचा ॲक्सेस घेऊन आयफोन खरेदी केला आणि मोबाईलचे ८२ हजार ९३३ रुपये क्रेडिट कार्ड मधून भरून फसवणूक केल्या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात ३० जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

वैभव सावंत हा चांभार्ली, मोहोपाडा येथे राहत असून त्याच्या मोबाईल मध्ये फ्लिपकार्ट अकाउंट आहे. २९ जानेवारी रोजी व्हॉट्सॲपवर एपीके फाईल आली. आरटीओ संदर्भातील फाईल असल्याने ती डाऊनलोड केली. त्यानंतर संध्याकाळी क्रेडिट कार्ड मधून २३८ रुपये डेबिट झाल्याचे दिसून आले. आणि पुन्हा क्रेडिट कार्ड मधून ८२ हजार ९३३ रुपये डेबिट झाल्याचे समजले. या वेळी मोबाईलचा एक्सेस घेऊन सायबर फ्रॉड झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी कस्टमर केअरला फोन करून क्रेडिट कार्ड ब्लॉक केले. फ्लिपकार्ट अकाउंट ओपन केले असता तीन टॅक्स इन्व्हाईस बिल प्राप्त झाले.

अनोळखी व्यक्तीने त्यांच्या मोबाईलचा एक्सेस घेऊन फ्लिपकार्ट अकाउंट वरून आयफोन खरेदी केला आणि त्याचे बील क्रेडिट कार्डमधून भरून फसवणूक केली.

## उरणमध्ये निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

आज ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या उरण तालुक्यातील जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. शुक्रवारी मतदान साहित्याचे पोलिस बंदोबस्तात वाटप करण्यात आले असल्याची माहिती उरणचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार डॉ. उध्दव कदम यांनी दिली. उरण तालुक्यातील नवघर, जासई, चाणजे, चिरनेर जिल्हा परिषदेच्या ४ जागांसाठी १४ तर पंचायत समितीच्या नवघर, भेंडखळ, जासई, चिर्ले, चाणजे, केगाव, चिरनेर, आवरे या पंचायत समितीच्या आठ जागांसाठी २३ अशा एकूण १२ जागांसाठी ३७ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

या १२ जागांसाठी आज मतदान होणार आहे.या १२ जागांसाठी एकूण १०८५२० मतदार मतदान करणार आहेत. यामध्ये पुरुष –५२८७३, स्त्री–५५६४५ ,तृतीय पंथी–२ आदी मतदारांचा समावेश आहे. तालुक्यात निवडणुकीसाठी एकूण १३५ मतदान केंद्र आहेत. या १३५ मतदार केंद्रांव्यतिरिक्त १० मतदान केंद्र राखीव ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक शिपाई व चार कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

मतदान निर्भयपणे पार पाडण्यासाठी पोलिस अधिकारी,पोलिस अंमलदार, पोलिस शिपाई असा एकूण ५४८ पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. आज होणाऱ्या उरण तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी काल शुक्रवारी उरणच्या निवडणूक कार्यालयातुन मतदान साहित्याचे पोलिस बंदोबस्तात वाटप करण्यात आले आहे. एसटी बसेस व इतर शासकीय गाड्यातुन मतदान साहित्य पोलिस बंदोबस्तात रवाना करण्यात आले असल्याची माहिती उरणचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार डॉ. उध्दव कदम यांनी दिली.

## आंगणेवाडी यात्रेनिमित्त मध्य रेल्वेकडून विशेष गाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

आंगणेवाडी यात्रेदरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव दरम्यान ४ विशेष गाड्या चालविणार आहे. यांचा फायदा मुंबई ठाणेसह कोकणवासीयांना होणार आहे.

आंगणेवाडी यात्रेदरम्यान प्रवाशांसाठी सोडण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये लोकमान्य टिळक टर्मिनस – मडगाव विशेष (२ सेवा) गाडी क्रमांक ०१००३ विशेष ही गाडी दिनांक ०८.०२.२०२६ व १०.०२.२०२६ रोजी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून ०७.५५ वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी २२.०० वाजता पोहचेल.

गाडी क्रमांक ०१००४ विशेष ही गाडी दिनांक ०७.०२.२०२६ व ०९.०२.२०२६ रोजी मडगाव येथून १६.३० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०५.५० वाजता पोहोचेल.

या गाड्यांसाठी ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवीम आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.

गाडी क्रमांक ०१००३ साठी विशेष शुल्कासह आरक्षण दिनांक ०६.०२.२०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in या संकेतस्थळावर खुले होईल.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रक जाणून घेण्यासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. असे आवाहन मध्य रेल्वेच्यावतीने करण्यात आले आहे.

## सुमित तुपट भाजप–राष्ट्रवादी युतीचे उमेदवार : विरोधकांकडून गैरसमज : अमित मोरे

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व महाड पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची युती असून, सुमित तुपट हे या युतीचेच उमेदवार असून विरोधकांकडून मतदारांमध्ये गैरसमज पसरविण्याचा प्रकार होत असून. या थापांना कोणीही बळी पडू नये असे आवाहन भाजपाचे करंजाडी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार अमित मोरे यांनी पत्रकार परिषद दरम्यान केले.

रायगड जिल्हा परिषद व महाड पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान करंजाडी जिल्हा परिषद मतदार संघातील गटामध्ये राष्ट्रवादी व भाजप युतीचे जिल्हा परिषदेचे उमेदवार अमित मोरे यांचा प्रचार जोरदार सुरू असून पंचायत समितीचे राष्ट्रवादीचे उमेदवार सुमित तुपट व प्रमिला गायकवाड यांनीदेखील प्रचारामध्ये आघाडी घेतली असून सुमित तुपट यांच्याबाबत ते उबाठा उमेदवार सोमनाथ ओझर्डे यांच्या सोबत असल्याचे भासवले जात आहे.



या प्रकरणाबाबत खुलासा करण्यासाठी अमित मोरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये सदर प्रकरणात विरोधकांकडून मतदारांची दिशाभूल केली जात असून सुमित तुपट हे युतीचेच उमेदवार असून आम्ही एकत्र प्रचार करत असल्याचे अमित मोरे यांनी सांगितले. तसेच विरोधकांच्या या भूलथापांना मतदारांनी बळी पडू नये असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान विन्हेरे विभागाचा विकास व रोजगार निर्मितीसाठी पनवेल शटल सेवा सुरू करण्याचा मानस असून वरिष्ठ पातळीवरती यासाठी प्रयत्न सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महाड तुळशी मार्गे खेड या पर्यायी मार्गासाठी काही गावामधी भूसंपादन झाले असून शेतकऱ्यांना त्याचा मोबदला मिळाला नाही. याबाबत देखील पुनर्वसन मंत्रांकडे पाठपुरावा करून या शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे मोरे यांनी यावेळी सांगितले.

माजी मंत्री प्रभाकर मोरे यांचे विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी तिच्या मार्फत ही निवडणूक लढवीत असून हे स्वप्न साकार करण्यासाठी विन्हेरे विभातील सर्व नागरिकांनी ७ फेब्रुवारी रोजी मोठ्या संख्येने आपल्याला मतदान करून विजयी करण्याचे विनंती केली आहे.

## नेरूळमध्ये आंतर महाविद्यालयीन युवा संसद उत्साहात; १०२ विद्यार्थ्यांनी नोंदवला सक्रिय सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनिटी फाउंडेशन यांच्या वतीने, माय युवा भारत, केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन– युवासंसद २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात बुधवारी टिळक कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली.

विद्यार्थी ते संसद सदस्य – उद्याचे नेतृत्व घडविण्याचा प्रवास (From Student to Parliamentarian - Shaping the Leaders of Tomorrow) या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना संसदीय कार्यपद्धतीची ओळख करून देणे, लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करणे तसेच धोरणात्मक चर्चेसाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.

या युवा संसदेत १५ विविध शैक्षणिक संस्थांमधील एकूण १०२ विद्यार्थ्यांनी संसदसदस्य म्हणून सक्रिय सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, पर्यावरणीय, शैक्षणिक व राष्ट्रीय विषयांवर विधेयके सादर करत संसदीय पद्धतीने अभ्यासपूर्ण चर्चा केली.



या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून पनवेल महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी नितीन साके, विशेष अतिथी म्हणून टिळक कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. हीना समानी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ४० विधेयकांचा समावेश असलेल्या युवा संसद एडिशन ०१ या विशेष पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी मांडलेले धोरणात्मक विचार, संशोधन व संसदीय चर्चेचे दस्तऐवजीकरण करण्यात आले असून ते युवकांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणार आहे. तसेच, सत्रामध्ये उत्कृष्ट संसदीय कामगिरी, प्रभावी मांडणी, सखोल संशोधन व नेतृत्वगुणांच्या आधारे ८ विद्यार्थ्यांना 'सर्वोत्कृष्ट संसद सदस्य' पुरस्काराने गौरविण्यात आले.

या उपक्रमामध्ये बाकलीवाल फाउंडेशन – कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय गुरू नानक कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सायन के.एल.ई. सोसायटीचे विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कळंबोली, एम.जी.एम. विद्यापीठ, कामोठे, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय, न्यू पनवेल, पिल्लई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, एस.आय.ई.एस. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नेरूळ एस.के. विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, टिळक कनिष्ठ महाविद्यालय, टिळक पब्लिक स्कूल, विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सी.के. ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पान १ वरुन

## पनवेलला मिळणार पहिला आगरी महापौर; तर क्रांतिवीरांच्या भूमीतील लेक होणार उपमहापौर!

अभिनव मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक सामाजिक, सांस्कृतिक व सेवाभावी उपक्रम राबवले आहेत. तसेच जाणीव या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून शिक्षण, आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर महापौर पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्षाच्या कळंबोली मंडळाच्या खजिनदार तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रमिला पाटील यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर कळंबोलीच्या राजकारणात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. श्रेया महिला बचत गट व नंदिनी महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण करण्याचे भरीव कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. महिलांच्या प्रश्नांची सखोल जाण आणि तळागाळातील महिलांशी थेट संवाद यामुळे महिलांपर्यंत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे पोहचविण्यात त्या यशस्वी ठरल्या आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत कळंबोलीतील प्रभाग क्रमांक ७, ८ व ९ या तिन्ही प्रभागांमधून भाजप महायुतीचे एकूण १२पैकी १२ उमेदवार विजयी झाले असून हा कळंबोलीतील ऐतिहासिक विजय मानला जात आहे. प्रभाग क्रमांक ७मधून प्रमिला पाटील यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार विद्या गायकवाड (जगदीश गायकवाड यांच्या भगिनी) यांचा दारूण पराभव करत मतदारांचा विश्वास दृढ केला. सामाजिक कार्य, संघटन कौशल्य आणि सर्वसामान्य नागरिकांशी असलेला जवळचा संपर्क यामुळे प्रमिला पाटील यांना उपमहापौरपदी विराजमान होण्याची संधी मिळाली आहे. त्यांचे माहेर आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके यांची पुण्यभूमी असलेल्या शिरढोण गावचे आहे. त्यामुळे शिरढोण गावची लाडकी लेक उपमहापौरपदी विराजमान होत असल्याने संपूर्ण गावात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## खोपोली नगरपालिकेचे स्वच्छतेसाठी एक पाऊल पुढे

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील कचरा व रस्ता स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या विशेष प्रयत्नांतून तसेच उपनगराध्यक्षांच्या पुढाकारातून डेमो गाडी (प्रात्यक्षिक स्वरूपात साफसफाईची गाडी) बोलवण्यात आली. या उपक्रमात मी स्वतः उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेची पाहणी केली. या वेळी आरोग्य सभापती तथा नगरसेविका. मयुरी शेलार तसेच यांच्यासह इतर मान्यवर व सहकारी पदाधिकारी



उपस्थित होते. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी खोपोली घडवण्याच्या उद्देशाने उपनगराध्यक्षांनी या उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेतला असून, त्यांची ही तत्परता, नियोजनबद्ध कामकाज व नागरिकांप्रती असलेली बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे.

खोपोली नगर परिषदेने रस्ता स्वच्छतेसाठी ही डेमो गाडी मागवली असून, सदर गाडीच्या माध्यमातून रस्ता स्वच्छतेचे काम कसे केले जाईल याचा प्रत्यक्ष डेमो दाखवण्यात आला. भविष्यात ही सेवा कायमस्वरूपी सुरू करण्याच्या दृष्टीने ही पाहणी व चाचणी करण्यात येत आहे. या उपक्रमातून शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागेल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## निवडक

### बेकायदेशीर मद्यविक्री; गुन्हा दाखल

**पनवेल :** पळस्पे या ठिकाणी बेकायदेशीर मद्यविक्री करणाऱ्या महिलेविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली. या ठिकाणाहून चार हजार ८०० रुपये किमतीचे मदय जप्त करण्यात आले. पळस्पे या ठिकाणी बेकायदेशीर मदय विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. या वेळी ३२ वर्षीयमहिलेकडे चार हजार आठशे रुपयांचे मद्य सापडून आले.

### गावठी दारूप्रकरणी कारवाई

**पनवेल :** तालुका पोलिसांनी गावठी दारू प्रकरणी दोन ठिकाणी कारवाई करत दोघांवर गुन्हा दाखल केला. पनवेल तालुका पोलिसांनी कानपोली येथे हातभट्टीच्या गावठी दारूवर कारवाई करत बारा लिटर गावठी दारू नष्ट करून गुन्हा दाखल केला, तर साईनगर वलप गाव येथे एका महिलेकडे २५ लिटर गावठी दारू सापडली.

### गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

**पनवेल :** श्री गजानन महाराज मंदिर ट्रस्ट गुरुपीठ नेरे यांच्या वतीने रविवार, ८ फेब्रुवारी रोजी नेरे येथे श्रींचा प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी श्री महाराज, श्री तुळजाभवानी आणि श्री मल्हारी मार्तंड देवता अभिषेक व महापूजा, श्री गजानन विजय ग्रंथ पहिला अध्याय वाचन, कीर्तन आणि पुष्पवृष्टी सोहळा होणार आहे. त्यानंतर आरती, प्रसाद, भजन, श्रींचा पालखी सोहळा आणि हरिपाठ, अभंगवाणी होणार आहे. या सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमध्ये फोक शिव व्याख्यान

**पनवेल :** ज्ञानदा प्रोडक्शन प्रस्तुत फोक शिव व्याख्यानाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे रविवार, ८ फेब्रुवारी रोजी रात्री साडेआठ वाजता करण्यात आले आहे. यावेळेस तीस कलाकारांसह स्वलिखित, स्वरचित, शिवगीतांचा सांगीतिक थाट पहावयास मिळणार आहे. संकल्पना दिग्दर्शन मिलिंद बाचल यांचे असून निर्माती माधुरी पाटील, निवेदक धीरेंद्र ठाकूर, संगीत– रोहित योगेश, गीतकार आकाश खंडागळे, योगेश पाटील, धीरेंद्र ठाकूर असणार आहेत.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** ओपन पार्किंगमध्ये पार्क ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल रेल्वे स्टेशन येथे घडली आहे. पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्द येथे राहणारे गणेश भगत यांनी त्यांच्या मालकीची ४० हजार रुपये किमतीची ग्रे रंगाची होन्डा शाईन (एम.एच.०३ बि.व्ही ०९७९) पनवेल रेल्वे स्टेशनबाहेर ओपन पार्किंगमध्ये पार्क ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उरण तालुक्यात भाजप महायुतीची बाईक रॅली



### मतदानाच्या पार्श्वभूमीवर प्रचार

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांनी उरण पूर्व विभागात बाईक रॅली काढून प्रचार करण्यात आला.

चिरनेर महागणपती येथे दर्शन घेवुन रॅलीला सुरुवात करण्यात आली. पुढे भोम, कळंबूसरे, मोठी जुई, मोठी जुई, कोप्रोली, खोपटे, पाणदिवे, पिरकोन, सारडे, पाले, गोवठणे व आवरे येथे सांगता समारोप करण्यात आला.

या वेळी चिरनेर जिल्हा परिषद गटाचे उमेदवार देवेंद्र विनायक पाटील, आवरे पंचायत समिती गण उमेदवार समिधा निलेश म्हात्रे, चिरनेर पंचायत समिती गण उमेदवार साक्षी सुजित पाटील यांच्यासह भाजप कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या वेळी भाजप तालुका ग्रामीण अध्यक्ष धनेश गावंड, उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, खोपटे सरपंच विशाखा ठाकूर, उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, सरचिटणीस उरण तालुका प्रशांत ठाकूर, समीर डुंगिकर उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, विवेक म्हात्रे, जीवन गावंड, रोषण पाटील, रसिक पाटील, युवा नेते प्रवीण घासे, कृष्णा ठाकूर, भारत पाटील, सुरज म्हात्रे, अमित म्हात्रे, बाळा गावंड, अश्विन म्हात्रे, संदीप पाटील, पूर्व विभाग अध्यक्ष महिला सौ.कोळी, परेश पाटील, के. वाय. गावंड व भाजप कार्यकर्ते सहभागी झाले होते.



## धूळ प्रदूषण करणाऱ्या वाहनांवर पनवेल महानगरपालिकेची कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण प्रदूषणाच्या तक्रारीबाबत पनवेल महापालिका अत्यंत संवेदनशीलपणे हाताळत असून दोषी आढळल्यास संबधितांवर कठोर कारवाई करत आहे. पनवेल येथे सुरू असलेल्या बांधकाम स्थळावरून मातीने भरलेले हायवा रस्त्यावरून ये–जा करत होते. या वाहतुकीदरम्यान वाहनांतून मोठ्या प्रमाणात रस्त्यावर माती सांडत होती. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ होत होती. याबाबत माहिती महापालिकेस मिळताच महापालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागाच्या वतीने माती वाहून नेणारे हायवा बंद करण्यात आले तसेच रस्त्यावर पडलेली माती त्या संबधित विकसकाच्या कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांद्वारे उचलून घेण्याचे निर्देश देण्यात आले.

वायू व ध्वनी प्रदूषण विषयक नियमांनुसार बांधकाम साहित्य तसेच रेडी मिक्स काँक्रीट वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे वरच्या बाजूने व सर्व बाजूनी पूर्ण झाकलेली असावीत. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्वच्छता राखण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व आरोग्य विभागाच्या वतीने सातत्याने साफसफाई केली जात असते, परंतु काही कंत्राटदार अगर बांधकाम विकसक हलगर्जीपणामुळे शहरातील कचरा, धूळीमध्ये वाढ होताना आढळल्यास महापालिकेच्या वतीने अशा संबधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश आयुक्त मंगेश चितळे यांनी दिले आहेत. यापुढेही अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या बांधकाम प्रकल्पांवर महापालिका सातत्याने कारवाई करत असून आजपर्यंत ३८ प्रकल्पांवरती स्थगतीची मोठी कारवाई करण्यात आली, तर २२ बांधकामस्थळांना सात दिवसांची नोटीस देण्यात आली आहे. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार तसेच पनवेल महापालिका आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार पनवेल महापालिका हद्दीतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण व पर्यावरणीय नियमांच्या उल्लंघनाबाबत तपासणी करण्यात आली. स्थळ पाहणी अहवालानुसार आतापर्यंत एकूण ३८ बांधकाम स्थळांवर कठोर कारवाई करण्यात आली असून या प्रकल्पांचे काम तात्काळ थांबविण्यात आले आहे.

## नवीन पनवेल येथील आगीतील दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना तातडीची मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील प्रभाग क्रमांक १८, सेक्टर १/ड मधील इंडस्ट्रियल एरिया परिसरात असलेल्या वसाहतीत अचानक लागलेल्या आगीत सात घरांचे संपूर्ण नुकसान झाले. सुदैवाने ही घटना दिवसा घडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र आगीत सात कुटुंबांचे घरगुती साहित्य, दैनंदिन उपयोगाच्या वस्तू तसेच शाळेत शिकणाऱ्या लहान मुलांचे शैक्षणिक साहित्य पूर्णतः जळून खाक झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच नवनिर्वाचित नगरसेविका ममता प्रितम म्हात्रे व ज्येष्ठ नेते प्रभाकर कांबळे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी आगीग्रस्त नागरिकांशी संवाद साधून त्यांचा आढावा घेतला. तसेच पनवेल महानगरपालिकेच्या प्रशासनाशी त्वरित संपर्क साधून बाधित कुटुंबांसाठी राहण्याची व खाण्यापिण्याची तातडीची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या.

> **कोणतीही जीवितहानी झाली नाही, हे समाधानकारक आहे, मात्र अशा कठीण प्रसंगी माझी जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था तसेच संपूर्ण भारतीय जनता पक्ष परिवार या कुटुंबांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. शासनाच्या सहकार्याने तसेच आमच्या माध्यमातून त्यांच्या जीवनाला पूर्वपदावर आणण्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल.**
>
> **–प्रितम जनार्दन म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते**

याचबरोबर, ज्या कुटुंबांची घरे पूर्णतः उध्वस्त झाली आहेत, त्यांना प्राथमिक स्वरूपात जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या माध्यमातून तातडीची आर्थिक मदत, कपडे तसेच लहान मुलांसाठी शैक्षणिक साहित्य देण्यात येईल, असे आश्वासन नगरसेविका ममता प्रितम म्हात्रे यांनी दिले.



**पनवेल : शासनाच्या १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत ई–गव्हर्नन्समध्ये पनवेल महानगरपालिका राज्यात प्रथम क्रमांक तसेच सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गतही महापालिकेचा प्रथम क्रमांक आल्याबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या वेळी माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा चिटणीस व नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष गणेश कडू, कळंबोली मंडळ माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, महापौरपदाचे उमेदवार नितीन पाटील, उपमहापौरपदाच्या उमेदवार प्रमिला पाटील, नगरसेवक विकास घरत, रवींद्र जोशी, हॅप्पी सिंग आदी उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये शिवजयंती नियोजनासंदर्भात बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून लोकसहभागातून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जयंतीच्या आयोजनाबाबत प्राथमिक नियोजन व विचारविनिमय करण्यासाठी शुक्रवारी (दि. ६) महापालिका मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.



या बैठकीस माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, विकास घरत, रवींद्र जोशी, हॅप्पी सिंग, नगरसेविका प्रमिला पाटील, उपायुक्त स्वरूप खारगे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, माजी नगरसेवक गणेश कडू, निर्मला म्हात्रे, रविशेठ पाटील यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती लोकसहभागातून साजरी करण्यात येणार असून त्या अनुषंगाने ही बैठक घेण्यात आली. या वेळची शिवजयंती भव्य स्वरूपात साजरी करण्याच्या दृष्टीने चित्ररथांची संख्या वाढविणे आणि स्पर्धांसाठी देण्यात येणाऱ्या बक्षिसांच्या रकमेबाबत वाढ करण्याबाबत या बैठकीत विविध सूचना मांडण्यात आल्या तसेच शिवजयंतीनिमित्त लेझीम व इतर सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

शिवजयंतीपूर्वी मिरवणूक मार्गावरील अडथळे दूर करून आवश्यक स्वच्छता करण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या तसेच शिवजयंतीच्या अनुषंगाने भांडार विभाग, सामान्य प्रशासन विभाग व बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबतही आढावा घेण्यात आला.

## दि.बा. पाटील विद्यालयात एसएससी शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात एसएससी शुभचिंतन सोहळा पार पडला. माध्यमिक शिक्षणातील सर्वात महत्त्वाची परीक्षेला विद्यार्थ्यांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा व मार्गदर्शन करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमावेळी पनवेल महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, विद्यालयाचे माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, माजी चेअरमन बाळाराम चिपळेकर, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भगवान गोवारी, उपाध्यक्ष सुभाष चिमणे, खजिनदार योगेश परदेशी, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगरे, गावंड सर आदी उपस्थित होते.

प्रास्तिकामध्ये विद्यार्थ्याचे मुख्याध्यापक कोंगेरे सर यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीची वाटचाल सांगितली तसेच विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत वेगवेगळ्या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यालयाचे नाव राष्ट्रीय पातळीवर चमकवले हे सांगितले.

विद्यालयातील शिक्षक दीपक खुटले सर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे शिक्षणाधिकारी माननीय रमेश चव्हाण यांनी आपल्या शाळेतील आठवणी सांगून रयत शिक्षण संस्थेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच एखादे ध्येय पूर्ण करत असताना आपले परिश्रम किती महत्त्वाचे आहेत हे उदाहरणांमधून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी चेअरमन स्वामी आप्पा म्हात्रे यांनी शाळा शिक्षक व कमिटी यांचे योगदान विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी किती महत्त्वाचे असते हे समजावून सांगितले तसेच विद्यार्थ्यांना भविष्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांकडून विद्यालयाला दोन कॉर्डलेस माईक भेट देण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन नववीच्या वर्गांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन जानवी कासार, धनश्री कुत्तरवाडे तर कार्यक्रमाचे आभार मयुरी वाघमारे या विद्यार्थ्यांनी मानले.

## पनवेलमध्ये ३४६ मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद रायगड व पंचायत समिती पनवेल सार्वत्रिक निवडणूक २०२६ करीता पनवेल तालुक्यतील ३४६ मतदान केंद्रावर ८ गट व १६ गणासाठी पार पडणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी एकुण ३४६ पथके तयार करण्यात आली आहे. पथके के. ई. एस. इंदुबाई ए. वाजेकर, इंग्लिश मिडीयम शाळा पनवेल येथुन मतदान यंत्रासह आपल्याला नेमुण दिलेल्या मतदान केंद्रावर आवश्यक पोलीस बंदोबस्तासह पोहोच झालेले आहे. पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद रायगड गटासाठी १८ उमेदवार व पंचायत समिती पनवेल गणासाठी ४६ उमेदवार निवडणूक लढवत आहे.

यासाठी पनवेल तालुक्यातील १८०० कर्मचारी मतदान केंद्रावर मतदान प्रक्रियेसाठी कार्यान्वित राहणार असुन त्यासाठी कर्मचारी व मतदान यंत्रे सुरक्षित पोहोच करण्यासाठी जवळपास ४० एस.टी. बसेस, ३० मिनी बसेस व २१ इको वाहन व क्षेत्रीय अधिकारी यांना ४४ चारचाकी वाहने पुरविण्यात आलेले आहे.

निवडणुकीची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी किशन जावळे, जिल्हाधिकारी, तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड अलिबाग, पवन चांडक, निवडणूक निर्णय अधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी, पनवेल व मिनल भामरे–भोसले,सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, तथा तहसीलदार पनवेल यांचे मार्गदर्शनाखाली मनुष्यबळ पथक, वाहन पथक, आचारसंहिता पथक, संगणकीय कामकाज पथक, अशा विविध पथकाने जवळपास एक महिण्यापासुन पुर्वतयारी केली आहे.

## रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये सायन्स फेस्ट व टेक्नो ब्रिंक उत्साहात सुरू

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विज्ञानप्रेमी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला तीन दिवसीय सायन्स फेस्ट व टेक्नो ब्रिंक प्रारंभ झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे सीडीसी सदस्य दीपक शिंदे यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिंदे यांनी आपल्या शालेय जीवनातील विज्ञान प्रदर्शनांच्या आठवणी सांगत विज्ञानाविषयीची जिज्ञासा व आवड सातत्याने जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित केले. विज्ञान आणि आधुनिक धावपळीच्या जीवनातील संबंध स्पष्ट करताना त्यांनी चार्ल्स डार्विन यांच्या सर्वायवल ऑफ द फिटेस्ट या सिद्धांताचा संदर्भ दिला. जीवनात येणाऱ्या विविध चढ–उतारांना धैर्य, संयम व चिकाटीने सामोरे गेले तरच यशस्वीपणे टिकून राहता येते, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध वैज्ञानिक प्रकल्प, प्रयोग व उपक्रमांच दीपक शिंदे यांनी विशेष कौतुक केले आणि त्यांच्या जिज्ञासू व संशोधक वृत्तीचे अभिनंदन केले. या वेळी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, रसायनशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. नीलम लोहकरे, कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख प्रा. रिझवाना मोमीन, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. राजश्री म्हात्रे तसेच मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या प्रमुख डॉ. रीत ठुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या सायन्स फेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयीची जिज्ञासा, सर्जनशीलता व संशोधनाची प्रेरणा अधिक दृढ होत असून हा उपक्रम शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे तीन दिवसीय सायन्स फेस्टसाठी मोलाचे सहकार्य लाभत आहे.



## संपादकीय

# अनाठायी ऑनलाईन प्रभाव

कोरिअन ड्रामा व संस्कृतीच्या टोकाच्या प्रभावाखाली बारा, चौदा व सोळा वर्षे वयाच्या तीन बहिणींनी आत्महत्या केल्याच्या प्रकरणाने पालकांना पुन्हा एकदा ऑनलाईन कंटेंटच्या अनाठायी प्रभावापासून मुलांना वाचवायचे तरी कसे असा प्रश्न पडला आहे. वरील प्रकरणापाठोपाठ अन्य एका चौदा वर्षांच्या मुलाने ऑनलाइन गेमचा टास्क पूर्ण करण्यापायी आयुष्य संपवल्याचे समोर आले आहे. मुलांचे ऑनलाईन भावविश्व त्यांना विचित्र विळख्यात जखडून वास्तव जगण्यापासून व कुटुंबापासून तोडणारे व अंतिमत: वैफल्याकडे व आत्मघाताकडे घेऊन जाणारे ठरू शकते हे या प्रकरणांतून पुन्हा समोर आले आहे.

**उत्तर प्रदेशमधील गाझियाबाद येथील तीन अल्पवयीन बहिणींनी नवव्या मजल्यावरील घरातून उडी मारून आत्महत्या केल्याची बातमी दोन दिवसांपूर्वी आली. मुलींनी कोरिअन ड्रामा व संबंधित संस्कृतीच्या टोकाच्या वेडापायी आत्महत्येचे पाऊल उचलल्याचे या मुलींच्या वडिलांनी सांगितले. पोलिसांना घरात सुसाइड नोट व डायरीही सापडली असून डायरीत या मुलींनी अवघ्या 'कोरिअन' विश्वावर त्यांचे किती प्रेम होते याचे वर्णन केले आहे. त्यापासून दूर होण्यापेक्षा आम्ही मरण स्वीकारू असे त्यांनी लिहून ठेवले आहे. बहिणींच्या विचित्र आत्महत्या प्रकरणाने असंख्य पालकांना पुन्हा एकदा ऑनलाइन कंटेंटच्या अनाठायी प्रभावापासून मुलांना वाचवायचे तरी कसे असा प्रश्न पडला आहे. चिंता वाटावी अशीच या संदर्भातील परिस्थिती असून या विशिष्ट प्रकरणात मात्र तणावाची अन्य कारणेही आहेत. कोविड काळापासून या मुलींनी शाळेत पाऊल न ठेवल्याचे तसेच त्यांचे कुठल्याही स्वरुपाचे शिक्षण सुरू नव्हते असेही दिसते आहे. शेअरबाजारात मोठा फटका बसल्याचे व कर्जाचा बोजा असल्याचे वडिलांनी पोलिसांना सांगितले आहे. या तणावग्रस्त परिस्थितीचा परिणामही मुलींवर झाला असणार. आर्थिक वैफल्याने ग्रासलेल्या कुटुंबातील अनेकांनी एकाचवेळी आत्महत्या करणे हीदेखील आता वरचेवर नजरेस पडणारी बाब होऊन बसली आहे. या प्रकरणात आर्थिक ताणतणावाचा प्रभाव किती हे अधिक तपासात पुढे येईलच, परंतु मुलांचे ऑनलाईन भावविश्व त्यांना एका विचित्र विळख्यात जखडून आसपासच्या वास्तव जगण्यापासून व कुटुंबापासून पूर्णपणे तोडणारे व अंतिमत: वैफल्याकडे व आत्मघाताकडे घेऊन जाणारे ठरू शकते हे या प्रकरणातून अधोरेखित झाले आहे. या मुलींचे काही महिन्यांपूर्वीपर्यंत युट्यूबवर एक चॅनल होते व त्यावर त्या कोरिअन ड्रामा व संस्कृतीविषयीचे आपले प्रेम व्यक्त करत असत. अल्पावधीत या चॅनलला चक्क काही हजार फॉलोअर्स मिळाले होते हे लक्षात घेतले पाहिजे. वडिलांनी काही काळापूर्वी त्यांचे हे चॅनल डिलीट केले. आम्हाला कोरियाला घेऊन चला, अन्यथा आम्ही मरून जाऊ असा हट्ट मुलींनी धरला होता असेही वडिलांनी पोलिसांना सांगितले आहे. त्या सतत कोरिअन ड्रामा, डान्स व संबंधित कंटेंट पाहात. तसाच पेहराव करून आपण कोरिअन असल्याचे इतरांना सांगत. इतकेच नव्हे तर त्यांनी आपली नावे बदलून स्वत:ला कोरिअन नावेही ठेवली होती. भारतीय पुरुषाशी लग्नाची कल्पनाही करू शकत नाही असाही उल्लेख डायरीत आहे. त्यांच्या या अति आहारी जाण्याला वैतागूनच आपण त्यांचे मोबाईल काढून घेतले व युट्यूब चॅनल डिलीट केले असे वडील म्हणतात. त्यामुळे मुली कमालीच्या उद्विग्न झाल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. ऑनलाईन कंटेंटचे वेड मुलांचे आयुष्य उद्ध्वस्त करते हे पुन्हा या प्रकरणांतून समोर आले आहे.**

# मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीने राज्यात भूजल सुधार

कोणत्याही राज्याला सुजलाम सुफलाम होण्यासाठी व जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी भूजलाचा स्तर चांगला असणे गरजेचे असते. भूजलस्तर सुधार म्हणजे दुष्काळापासून मुक्तता हा मंत्र ठरला आहे. राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा हाच ध्यास व मंत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उराशी बाळगून वर्ष २०१५च्या सुरुवातीलाच जलयुक्त शिवार ही महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून भूजलस्तर वाढून राज्यात दुष्काळी भागाची स्थिती सुधारली.



या कार्यक्रमाला जोड म्हणून मुख्यमंत्र्यांच्या सक्षम नेतृत्वात राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, अटल भूजल योजना आणि जलजीवन मिशनची अंमलबजावणीही प्रभावीपणे होत आहे. परिणामी केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेप्रमाणे विहित कार्यपद्धतीत अंतर्गत भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार वर्ष २०२५ अखेर राज्यातील ३५३ तालुक्यांपैकी ३५२ तालुक्यांत दुष्काळ नसल्याचे व भूजल तूट वर्गवारी सामान्य असल्याची आणि मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर १.५२ मीटरने वाढल्याची सुवार्ता पुढे आली आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेच्या उपजीविकेचा मुख्य स्रोत शेतीच आहे, तर ८२ टक्के भूभाग हा पावसावर अवलंबून आहे. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भातील काही गावांमध्ये अनिश्चित व अपुऱ्या पावसामुळे दुष्काळी स्थिती निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानावर आणि शेतीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे चित्र होते. पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळीत होणारी तूट भरून काढण्यासाठी व या सर्व परिस्थितीत कृतीशील कार्याद्वारे बदल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने २६ जानेवारी २०१५ रोजी राज्यात जलयुक्त शिवार ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यास सुरुवात झाली. २५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याच्या उद्दिष्टातून लोकसहभागाद्वारे सूक्ष्म सिंचन आणि पावसाचे पाणी साठविण्यास सुरुवात झाली. स्थानिक जलप्रवाहांना मोठ्या जलप्रवाहांशी आणि नैसर्गिक प्रवाह उपलब्ध नसलेल्या ठिकाणी जलवाहिन्या तयार करून जलप्रवाहांशी जोडण्यात आले. पाण्याच्या प्रवाहाची आवक होऊन हे पाणी संवर्धनासाठी सूक्ष्म जलसाठ्यांमध्ये वाहून नेण्यात येऊ लागले. उपलब्ध जलप्रवाहांचे पुनरुज्जीवन करण्यावर आणि गावांमध्ये नवीन जलप्रवाह निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

नद्यांच्या तळांचे रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यावर भर देण्यात आला. पाण्याची झिरपण रोखण्यासाठी तलाव, तळी, शेततळे आणि कालव्यांमधून गाळ काढण्यात आला. चेकडॅम, कालवे, लहान तलाव आणि सार्वजनिक व खाजगी विहीरी बांधण्यात आल्या. पावसाच्या पाण्याची साठवण करण्यात आली. विशेषकरून दुष्काळी भागात वाहून जाणारे पावसाचे पाणी अडविण्यात आले. शेतीसाठी कार्यक्षमतेने पाणी वापराबाबत जागरूकता निर्माण करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणही करण्यात आले. परिणामी २०१९पर्यंत राज्यात अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण होऊन १९ हजार ६५५ गावे कायमस्वरूपी दुष्काळमुक्त झाली. या काळातच २२ हजार ५३९ गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेच्या सहा लाख ३२ हजार ८९६ कामांद्वारे २७ लाख आठ हजार २७९ टीएमसी जलसाठा क्षमता निर्माण होऊन ३९ लाख चार हजार ३९४ हेक्टर सिंचन क्षमतेचा भूभाग निर्माण झाला. याद्वारे २९ हजार ५४४ गावांना पाणीपुरवठा करण्याचे लक्ष पूर्ण झाले. लक्षणीय यशानंतर पुन्हा ३ जानेवारी २०२३पासून राज्यात जलशिवार योजना (२.०) सुरू करण्यात आली.

प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता निर्माण करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने वर्ष २०१५-१६पासून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सुरू केली. राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्याच्या ६०:४० हिश्श्याच्या अर्थसाहाय्याद्वारे ही योजना सुरू आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या ९५व्या जन्मदिनी २५ डिसेंबर २०१९ रोजी केंद्र शासनाने महाराष्ट्रासह सहा राज्यांच्या ७८ जिल्ह्यांमधील कायम दुर्भिक्ष असणाऱ्या ८३५० ग्रामपंचायतींसाठी अटल भूजल योजना सुरू केली. जागतिक बँकेच्या सहकार्यातून केंद्र शासनाने या योजनेसाठी ६००० कोटी रुपयांस मंजुरी दिली होती. लोकसहभागातून या योजनेत अंतर्भूत सर्व ७८ जिल्ह्यांमधील ८३५० ग्रामपंचायतींचा भूजल आराखडाही संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जल जीवन मिशन या केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या योजनेमुळेही ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामीण घराला सुरक्षित, शुद्ध आणि पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी नळजोडणीद्वारे नियमितपणे उपलब्ध करून देण्याचा उद्देश यशस्वी होताना दिसत आहे. १५ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू झालेल्या या योजनेनुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन सुरू करण्यात आले. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच अन्य विभागांच्या समन्वयाने व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेने जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे तयार करण्यात येतात. या सर्व प्रयत्नांतून राज्यातील दुष्काळी परिस्थिती सुधारत असल्याचे चित्र आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल दुष्काळ निर्देशांकात ते प्रकर्षाने दिसते.

राज्याच्या महसूल व वनविभागाचा ७ ऑक्टोबर २०१७चा शासन निर्णय आणि केंद्र शासनाची दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ च्या अनुषंगाने राज्यात दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. यानुसार राज्यातील परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रामुख्याने वनस्पती निर्देशांक, मृद आर्दता निर्देशांक, जलविषयक निर्देशांक व पिकांचे क्षेत्रीय सर्वेक्षण, सत्यापन विचारात घेण्यात येतात.

यातील जलविषयक निर्देशांक हा राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत कार्यरत व पुणे स्थित भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए)द्वारे तयार करण्यात येतो. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक गरजांसाठी भूजलाचे सर्वेक्षण, संशोधन, नियोजन आणि विकास करणारी ही यंत्रणा तालुका निहाय भूजल दुष्काळ निर्देशांक तयार करून या निर्देशांकाचे मूल्य व त्यानुसार भूजल तुटीची वर्गवारी दर तीन महिन्याने जाहीर करते.

राज्यात एकूण ३९२० निरीक्षण विहिरी स्थिर भूजल पातळीच्या मोजणीसाठी स्थापित करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ऑक्टोबर २०२५मध्ये ३६६५ निरीक्षण विहिरींची माहिती संकलित करण्यात आली असून त्यानुसार वर्ष २०२५चा भूजल पातळी निर्देशांक काढण्यात आला आहे. यात राज्यातील ३३ जिल्ह्यांतील ३५२ तालुक्यांमध्ये भूजल पातळी ०.१५.च्या आत असून भूजल तुटीची वर्गवारी सामान्य असून अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यात हा निर्देशांक ०.१६ ते ०.३० दरम्यान असल्याने भूजल तुटीची वर्गवारी सौम्य वर्गात समाविष्ट आहे. ०.६०पर्यंत एकूण पाच स्तरांमध्ये भूजल पातळी निर्देशांकानुसार सामान्य, सौम्य, मध्यम, गंभीर आणि अती गंभीर अशी भूजल तुटीची वर्गवारी काढण्यात येते.

मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर १.५२ मिटरने वाढला असून राज्याच्या दृष्टीने ही महत्वाची उपलब्धी आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत राज्यातील कोणताच तालुका मध्यम, गंभीर आणि अती गंभीर भूजल तुटीच्या वर्गात नसल्याने हे सकारात्मक चित्र आहे.

भूजलाच्या दृष्टीने नेहमीच संवेदनशील समजल्या जाणाऱ्या विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडल्याचे दिसून येते. अकोला, बुलडाणा, यवतमाळ, नागपूर, जालना, बीड, धाराशिव, लातूर व परभणी जिल्ह्यांमधील सर्वच तालुके सामान्य भूजल तुटीच्या श्रेणीत आहेत. त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामध्येही भूजल तूट स्थिर असून पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यांमधील तालुक्यांचा यात समावेश आहे.

भूगर्भातील जल हे शाश्वत आहे. शेती, पिण्यासाठी, पर्यावरण आणि उद्योगासाठी आपणास ते वर्तमानकाळात टिकवून भविष्यासाठीही राखून ठेवायचे आहे. त्यासाठी खात्रीपूर्वक व संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने सुरू झालेली जलयुक्त शिवार योजना आणि राज्यातील दुष्काळ कायमचा नष्ट करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबविण्याच्या कामालाही गती प्राप्त झाली आहे. त्याचा परिणाम होऊन झालेले बदल भूजल पातळी निर्देशांकातील आकड्यांद्वारे अधिक स्पष्ट झाले आहेत. या योजनांसह केंद्र शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्याला दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने राज्य मार्गक्रमण करीत आहे.

**-रितेश मो.भुयार, माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क नागपूर**



## बदलते तंत्रज्ञान

# टेलीग्रामवर 'हे' काम करणे ठरू शकते धोकादायक!

टेलीग्राम या भारतीय ॲपला अल्पावधीतच खूप लोकप्रियता मिळवण्यात यश आले आहे. मेसेजिंग सोबतच या ॲपवर अशी उत्कृष्ट वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत, जी तुम्हाला खूप आवडतील.




या ॲपवर ऑनलाइन एडिटिंग तसेच उत्कृष्ट स्टेटस आणि चॅटिंग पर्याय आहेत. वेगळ्या धाटणीच्या या गोष्टी तुमचा अनुभव नक्कीच उत्कृष्ट बनवायला मदत करतील. त्यामुळे लाखो युजर्स या ॲपचा वापर करत आहेत, पण तुम्हाला माहिती आहे का की, गेल्या काही वर्षात या ॲपचा वापर इतर कारणांमुळे अधिक वाढला आहे. त्यापैकी सर्वात मोठे कारण म्हणजे- अनेक कंपन्यांची फसवणूक करणे म्हणजे विविध गोष्टींची पायरसी.

तुम्हाला ही गोष्ट समजल्यावर आश्चर्य वाटेल की, या ॲपवर सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म म्हणजेच नेटफ्लिक्स असो वा प्राइम व्हिडिओ आणि डिस्ने प्लस हॉटस्टार असो वा आणखी काही... साऱ्या ॲपवरील चित्रपट विनामूल्य पाहता येत आहेत. आणि याचे ओटीटी प्लॅटफॉर्मला मात्र खूप नुकसान होत आहे.

चित्रपटांचे पायरेटेड व्हर्जन या ॲपवर अनेक चॅनल्सच्या मार्फत अपलोड केले जात आहे. महत्त्वाचे म्हणजे, यात चित्रपटांचा दर्जा इतका उत्तम असतो की तो चित्रपट चुकीच्या मार्गाने अपलोड करण्यात आलेचे जाणवातही नाही. त्यामुळे लोक नवे चित्रपट आणि वेब सिरीज डाउनलोड करून पाहत असल्याचे बोलले जात आहे, पण असे करत असाल तर वेळीच सावध व्हा.

**काय होऊ शकते कारवाई?**

एखाद्या चित्रपटाच्या किंवा वेब सिरीजच्या पायरेटेड प्रतशी संबंधित असणं हे बेकायदेशीर आहे. कदाचित तुम्ही टेलिग्रामवरून ओटीटी प्लॅटफॉर्मवर चित्रपट डाउनलोड केला असेल, परंतु असे करणे बेकायदेशीर आहे आणि जर तुम्ही असे करताना पकडले गेलात तर तुम्हाला व्हिडीओ पायरसीसाठी थेट कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे अशा गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे असे काही करत असाल तर ते वेळीच थांबवा, कारण तुम्ही तसे करताना जर पकडला गेलात, तुमच्यावर कारवाई होऊ शकते.

# महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी

महानुभाव पंथाचे संस्थापक, थोर समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांची आज जयंती. महानुभाव धर्मीयांच्या श्रद्धेनुसार त्यांना ईश्वरांच्या पंचावतारांपैकी पाचवा अवतार मानले जाते. लीळाचरित्र या मराठीतील पहिल्या चरित्रग्रंथाचे ते नायक म्हणून इतिहासात त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. वैदिक परंपरेला नाकारून सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणारे चक्रधर स्वामी हे महाराष्ट्रातील पहिले ज्ञात समाजसुधारक होत. चक्रधर स्वामींचा जन्म सन ११९४मध्ये भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला झाला. चक्रधर स्वामींच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला थोडक्यात आढावा...



## निमित्त


चक्रधर स्वामी यांच्या प्रारंभिक जीवनासंबंधीची माहिती लीळाचरित्राच्या या ग्रंथाच्या एकांक या भागात पाहायला मिळते. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजराथमधील भडोच येथे चक्रधर स्वामी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विशाळदेव हे भडोचचा राजा मल्लदेव याचे प्रधान होते. त्यांच्या आईचे नाव म्हाळईसा होते. चक्रधरांचे पाळण्यातील नाव हरपाळदेव असे होते.

युवा झाल्यावर हरपाळदेव यांचा विवाह कमळाईसा यांच्याबरोबर झाला. याच काळात त्यांनी युद्धांतही पराक्रम गाजवला. पुढे हरपाळदेवांना आजारी लोकांची सेवा करायचा छंद जडला. ते राजवाडा सोडून आजारी लोकांबरोबर वेळ घालवू लागले. कालांतराने त्यांची प्रकृती अचानक खालवली व त्यांचा मृत्यू झाला, परंतु सरणावर ठेवल्यावर हरपाळदेव जिवंत असल्याचे आढळून आले. महानुभावीयांच्या श्रद्धेनुसार या वेळी श्रीकृष्णाने त्यांच्या शरीरात प्रवेश करून अवतार धारण केला. महानुभावीयांच्या पंच अवतारातील तिसरा अवतार श्री चांगदेव यांचा त्याच सुमारास मृत्यू झाला होता. त्यामुळे त्याचा आत्मा चक्रधर स्वामी यांच्या शरीरात शिरल्याचा एक मतप्रवाह आहे.

सर्वस्वाचा त्याग करून भ्रमण करत असताना हरपाळदेव ऋद्धिपूर येथे आले. तिथे त्यांना विरक्त अवस्थेतील गोविंदप्रभू दिसले. गोविंदप्रभूंपासून हरपाळदेव यांना शक्ती प्राप्त झाल्या. गोविंदप्रभूंनी त्यांना चक्रधर असे नाव दिले. गोविंदप्रभूंपासून शक्ती मिळाल्यानंतर चक्रधरांची विरक्ती अधिकच वाढू लागली. लीळाचरित्राच्या एकांक या भागात त्यांच्या या काळातील भ्रमंतीचे वर्णन आहे. अहमदनगर जिल्यातील पाथर्डीपासून १८ किमी अंतरावर असलेल्या येळी या गावात चक्रधरस्वामींनी काही काळ घालवला. येळी येथे महानुभाव पंथीय मंदिर आहे. पुढे महाराष्ट्रभर एकट्यानेच त्यांनी भटकंती केली.

सिंहस्थ यात्रेनिमित्ताने ते त्र्यंबकेश्वरला जाण्यास निघाले. वाटेत पैठण येथे त्यांनी त्र्यंबकेश्वरास जाण्याचा बेत रद्द करून पैठण येथेच विधिवत संन्यासाची दीक्षा घेतली. यानंतरच्या काळात त्यांनी प्रकटपणे समाज व धर्मसुधारणेचे त्यांचे कार्य सुरू केले. एकाकी भ्रमणाच्या काळात चक्रधरांनी लोकजीवन प्रत्यक्ष पाहिले. त्या काळातील सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे अवलोकन केले. त्यांच्या पुढील ज्ञानदानाच्या कार्याची पूर्वतयारीच या काळात झाली, असे सांगितले जाते. अशा या महात्म्याने ७ फेब्रुवारी १२७४ रोजी आपला देह ठेवला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर



# घशात होणाऱ्या जळजळीवर 'हे' उपाय ठरतील फायदेशीर

सिड रिफ्लेक्समुळे घशात जळजळ होते, परंतु त्याशिवाय, धूम्रपान, लर्जी, सर्दी, व्हायरल किंवा बॅक्टेरियाच्या संसर्गामुळे देखील घशात जळजळ होऊ शकते. घशात जळजळ होत असल्यास, बोलण्यासोबतच खातानाही त्रास होतो. काहीवेळा लोकांना अनेक आठवडे त्याचा त्रास होतो. औषधे घेतल्याने त्यापासून आराम मिळू शकतो. पण काही काही घरगुती उपायांच्या मदतीनेदेखील तुम्ही या समस्येपासून आराम मिळवू शकता. त्याबद्दल अधिक माहिती जाणून घेऊया...

घशातील जळजळ थांबवण्याचे काही उपाय खाली देण्यात आले आहेत. हे उपाय घरगुती आहेत. त्यांचा अवलंब करा.

**नारळ पाणी:** घशाच्या जळजळीपासून त्वरित आराम मिळविण्यासाठी नारळाचे पाणी प्या कारण त्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म आहेत. खाल्ल्यानंतर घशात जळजळ होत असेल तर सामान्य पाणी पिण्याऐवजी अर्ध्या तासानंतर नारळाचे पाणी प्या.

**मध :** घशातील जळजळ थांबवायची असेल तर मधाचे सेवन करणेदेखील खूप फायदेशीर आहे. मधातील अँटी-बॅक्टेरिअल घटक घशात जळजळ होण्याच्या समस्येपासून त्वरित आराम देते. त्यामुळे कोमट पाण्यात मध आणि लिंबाच्या रसाचे काही थेंब मिक्स करून प्या.

**मीठाच्या पाण्याने गुळण्या कराव्यात :** घशात खूप जळजळ होत असेल तर मीठाच्या पाण्याने गुळण्या करणे हेदेखील खूप फायदेशीर ठरेल. यासाठी एक कप कोमट पाण्यात पाव चमचा मीठ घालून त्या पाण्याने दिवसातून दोन वेळा गुळण्या कराव्यात. याने खूप आराम मिळेल.

**हळद :** हळदीचे सेवन केल्यानेही घशातील जळजळीपासून आराम मिळू शकतो. हे खूप प्रभावी ठरते. हळदीमध्ये कर्क्युमिन तत्व असते, जे अँटी-इनफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरिअल असते. त्यामुळे हळदीच्या सेवनाने या समस्येपासून त्वरित सुटका मिळते. फक्त एक चमचा हळद पाण्यात मिसळून ते पाणी प्यावे.

# ग्रामीण भागात भाजपला वाढता प्रतिसाद -अमित घाग

**धाटाव : प्रतिनिधी**

घोसाळे जिल्हा परिषद मतदारसंघात यंदाची निवडणूक अत्यंत चुरशीची असली तरी भाजपला ग्रामीण भागातील मतदारांचा मोठा पाठिंबा मिळत असून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या तिन्ही जागांवर भाजपचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील, असा विश्वास भाजपचे तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी व्यक्त केला आहे.

सर्व कार्यकर्ते ताकतीने या निवडणुकीमध्ये उतरले आहेत. वरिष्ठ नेत्यांनी सुद्धा मतदान संघात विशेष या ठिकाणी लक्ष दिलेला आहे. घोसाळे जिल्हा परिषद मतदारसंघातून भाजपचे ज्येष्ठ नेते पंडित पाटील यांच्या पत्नी भावना



पाटील निवडणूक लढवत असून पंचायत समितीसाठी घोसाळे विभागातून प्रकाश लक्ष्मण धुमाळ आणि न्हाले पंचायत समिती मतदारसंघातून सिद्धीका धंसाडे हे उमेदवार रिंगणात आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यात भाजपाने महत्त्वाची भूमिका बजावली असून याचा थेट लाभ ग्रामीण जनतेला मिळत आहे. माजी आमदार पंडित पाटील यांच्या कार्यकाळात कोट्यवधी रुपयांची विकासकामे करण्यात आली असून रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात मोठी प्रगती झाली आहे.

चणेरा व घोसाळे विभागातील प्रत्येक गावात भाजपाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश सुरू आहेत. तळागाळातील जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून काम केल्यामुळे भाजपावर जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. येणाऱ्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला या संपूर्ण परिसरात घवघवीत यश मिळेल, असा विश्वासही घाग यांनी व्यक्त केला.

# कारागृहात कर्करोग दिनानिमित्त जनजागृती

## लक्षणे, कारणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत बंद्यांना मार्गदर्शन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कर्करोग हा जगातील सर्वात गंभीर आणि जीवघेण्या आजारांपैकी एक मानला जातो. दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यु या आजारामुळे होतो, कर्करोगाबाबत जनजागृती वाढावी, वेळेवर त्तपासणी आणि योग्य उपचार व्हावेत यासाठी दरवर्षी ४ फेब्रुवारी रोजी जागतीक कर्करोग दिन साजरा केला जातो.

जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून कारागृहातील दाखल बंद्यांमध्ये जनजागृती व्हावी तसंच कर्करोगाबाबत असलेले गैरसमज दूर करणे, कर्करोगाची लक्षणे, कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याची माहित्ती देण्यासाठी नुकताच अलिबाग जिल्हा कारागृहात जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला असल्याची माहिती अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह, वर्ग–२ विशाल बाळासाहेब बांदल यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे



हस्ते झाली उपस्थित मान्यवरांचे स्वागत अधीक्षक, अलिबाग जिल्हा कारागृह यांच्यामार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रबोधन सामाजिक सेवा संस्था, अलिबाग डॉ. मिलिंद पाटील व उज्वल भविष्य सामाजिक संस्था, अलिबाग डॉ.नितीन गांधी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जागतिक कर्करोग दिनाची सुरुवात कशी झाली तसेच या दिवसाचा मुख्य उद्देश, कर्करोगाची लक्षणे, कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत बंद्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उज्वल भविष्य सामाजिक संस्था, अलिबाग डॉ. राजाराम हुलबान यांनी बंद्यांना मार्गदर्शन करताना कर्करोगाबाचत समाजात असलेले गैरसमज दूर करणे, कर्करोग हा फक्त शारीरिक आजार नसून तो मानसिक आणि सामाजिक आवाहन ही आहे.

या आजारामुळे रुग्णासोबत त्याच्या कुटुंबालाही अनेक अडचणींना सामोरे जावे जागते. या दिवसामागील हेतु म्हणजे समाजात कर्करोगाविषयी जागरुकता वाढवावी. कर्करोगाची वेळेवर ओळख व उपाययोजनांचे महत्व समजावणे, कर्करोगग्रस्त आणि कुटुंबाला मानसिक व सामाजिक आधार देणे योग्य माहिती वेळेवर मिळाल्यास, जागरुकता आणि उपचार मिळाल्यास अनेकांचे जीवन वाचू शकते याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाकरीता अलिबाग जिल्हा कारागृहातील रामहरी कुटे, सुभेदार, सुनिल जाधव, हवालदार, अजय जावळे, सतिश जुंबळे, का. शिपाई तसेच श्रीम.क्रांती कदम, महिला शिपाई इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

# जि.प. व पंचायत समिती निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चार जिल्हापरिषद गट व आठ पंचायत समिती गणाच्या मतदानासाठी निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. रोहा तालुक्यातील जिल्हापरिषद व पंचायतसमिती निवडणुकीची रणधुमाळी थांबल्यानंतर निवडणुकीच्या अंतिम टप्प्यातील महत्त्वाच्या प्रक्रियेतील मतदानासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे.

रोहा तालुक्यात १९४ केंद्र असून प्रत्येक केंद्रात पाच अधिकारी असे एकुण ९७० अधिकारी तैनात करण्यात आले आहे. २३ झोनच्या माध्यमातून निवडणूक प्रक्रिया लक्ष ठेवले जात आहे. या माध्यमातून पथक तयार करण्यात आले आहे. शुक्रवारी सकाळपासूनच यंत्रणेची लगबग सुरू होती.

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त असणार आहे. रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ५ पोलीस अधिकारी, ९० पोलीस व १४५ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.

कोलाड पोलीस स्टेशनच्या हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली २ अधिकारी, ४१ पोलीस कर्मचारी व ५६ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत, नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली २० पोलीस अंमलदार व ०१ अधिकारी नागोठणे पोलीस ठाणेचे ४० अंमलदार, चार अधिकारी व ७६ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत.

# कडावमध्ये पोलिसांचा रूटमार्च

## शांततेत मतदान करण्याचे आवाहन

**कर्जत : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. हे मतदान शांततेपडावे पडावे यासाठी कर्जत पोलिसांनी कडाव गावामध्ये रूट मार्च करून मतदान शांततेत करावे असे आवाहन केले आहे.

कर्जत तालुक्यात नेहमीच शांततेत मतदान होते. काही ठिकाणी मतदान करून घेण्यासाठी असलेले कार्यकर्ते एकत्रित फिरताना दिसतात. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडत नाही. मात्र तरीही खबरदारी म्हणून कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कडाव येथील पाटील फूड प्लाझा पासून रूट मार्चला सुरुवात केली. त्यानंतर संपूर्ण कडाव गावात त्यांनी रूट मार्च केला. या वेळी पोलीस पाटील रमेश पवळी यांचाही सहभाग होता.




# मतदार केंद्राचा ताबा घेण्यासाठी नियुक्त शिक्षक व अन्य कर्मचारी रवाना

**मुरूड : प्रतिनिधी**

७ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य निवडून आणण्यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मुरूड तालुक्यात दोन जिल्हा परिषद सदस्य व चार पंचायत समिती सदस्य निवडून येणार आहेत. यासाठी शनिवारी सकाळपासून मतदान प्रक्रिया सुरू होणार असल्याने निवडणुकीचे काम करण्यासाठी नियुक्त शाळेचे शिक्षक व विविध कार्यालयातील कर्मचार सकाळीच मुरूड तहसील कार्यालयात हजर होऊन सर्वांनी मतदानाचे साहित्य ताब्यात घेऊन आपले केंद्र ताब्यात घेण्यासाठी रवाना झाले आहेत.

मुरूड पोलीस ठाण्याकडून चोख पोलिस बंदोबस्त व अतिरिक्त पोलिस कर्मचारी निवडणुकीचे काम करण्यासाठी तैनात करण्यात आले आहेत. मुरूड तालुक्यात ५५ हजार पाचशे बावन्न मतदार असून उद्या ते



आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मुरुड तालुक्यात पूर्वी ७१ मतदान केंद्र होती आता ही केंद्र ८१ वर पोहचली आहेत. अकराशेच्या वर मतदान असणाऱ्या केंद्राची संख्या वाढवण्यात आली आहे. त्यामुळे मतदान सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण भागातील लोक मुंबई येथे कामास असतात, परंतु त्यांचे मतदान गावाकडे असल्याने आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी शेकडो च्या संख्येने लोक गावाकडे आपले मतदान करण्यासाठी येणार आहेत. यासाठी विशेष बस बुक करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. मुंबई कडील लोक गावात येणार असल्याने मतदानासाठी मोठी गर्दी होणार आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून उद्या होणाऱ्या मतदानासाठी लोक उत्सुक दिसून येत आहे.

# कर्जतमध्ये एकूण ४६ उमेदवारांसाठी आज मतदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात सहा जिल्हा परिषद गटांमध्ये १८ तर कर्जत पंचायत समितीच्या १२ जागांसाठी २८ उमेदवार यांच्यात १८ जागांसाठी निवडणूक होत आहे. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून तालुक्यात शिवसेना शिंदे गट – भाजप आणि शेतकरी कामगार पक्ष अशी महायुती झाली आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी यांच्या कर्जत परिवर्तन आघाडी या दोन आघाड्यांमध्ये चुरशीची लढत होत आहे.

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे सहा आणि कर्जत पंचायत समितीचे १२ जागांसाठी मतदान होत आहे. सहा जागांसाठी १८ उमेदवार रिंगणात असून कळंब, कशेळे, नेरळ आणि मोठे वेणगाव या चार गटामध्ये सरळ दुरंगी लढत होत आहे तर माणगावतर्फे वरेडी मध्ये महायुती,कर्जत परिवर्तन आघाडी, भाजप, राष्ट्रीय काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष अशी पंचरंगी लढत होत आहे. मोठे वेणगाव मध्ये महायुती, कर्जत परीवर्तन आघाडी आणि राष्ट्रीय काँग्रेस अशी तिरंगी लढत होत आहे.

पंचायत समितीच्या १२ गणामध्ये २८ उमेदवार रिंगणात असून पोशीर, कळंब, पाथरज, कशेळे, माणगाव, वाकस, कडाव, मोठे वेणगाव आणि बीड बुद्रुक अशा १० गणांमध्ये सरळ लढत होत आहे. उकरूळ मध्ये महायुती, परिवर्तन विकास आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना अशी तिरंगी तर दामत मध्ये महायुती, परिवर्तन विकास आघाडी, एक अपक्ष अशी तिरंगी आणि नेरळ मध्ये महायुती, परिवर्तन विकास आघाडी,राष्ट्रीय काँग्रेस, अपक्ष अशी चौरंगी लढत होत आहे.

### नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/2023-GP-7294B मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AR 8287 चे मालक **सुरेन्द्र सिंह बच्चा सिंह चौहान** यांचे तारीख ०९/०३/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

**मी शारदा सुरेन्द्र सिंह,** पत्ता : फ्लॅट नं.५, सरोज भवन, कोर्ट लेन, ओल्ड कोर्ट बिल्डींगजवळ, विक्रोळी वेस्ट, मुंबई–४०००८३. उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव –** शारदा सुरेन्द्र सिंह,
पत्ता : फ्लॅट नं.५, सरोज भवन, कोर्ट लेन, ओल्ड कोर्ट बिल्डींगजवळ, विक्रोळी वेस्ट, मुंबई–४०००८३
दिनांक : ६/०२/२०२६

# तळा कॉलेजमध्ये वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा



**तळा : प्रतिनिधी**

द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे नुकतेच स्वातंत्र्यसेनानी प्रभाकर देशमुख आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा आणि डॉ.प्र.म. जोशी आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सहा महाविद्यालयातील संघांनी सहभाग घेतला.

वक्तृत्व स्पर्धेमध्ये पीएनपी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक, द.ग. तटकरे महाविद्यालय माणगाव द्वितीय क्रमांक आणि जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स यांना तृतीय क्रमांक मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. वादविवाद स्पर्धेसाठी पुरेसे स्पर्धक नसल्यामुळे तृतीय क्रमांकाचे एकच पारितोषिक काढण्यात आले ते पीएनपी महाविद्यालयास देण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ.संजय धनावडे प्रभारी प्राचार्य एम.एम. जगताप महाविद्यालय महाड व प्रा. प्रसन्न म्हसाळकर वरदाताई तटकरे महिला महाविद्यालय धाटाव ता. रोहा यांनी काम पाहिले.

या वेळी संस्थेचे विश्वस्त मारूती शिर्के, अध्यक्ष मंगेश देशमुख, संस्थेचे सचिव महेंद्र कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. भगवान लोखंडे यांनी केले. स्पर्धेच्या नियमावलींचे वाचन डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब यादव यांनी या स्पर्धांचे औचित्य आपल्या मनोगतातून व्यक्त केले. निवेदन प्रा. साक्षी गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. तृप्ती थोरात यांनी मानले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकतेर कर्मचारी, विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.

# माणगावच्या लीड स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा उत्साह

**माणगाव : बातमीदार**

स्थानिक 'लीड स्कूल माणगाव' येथे शैक्षणिक वर्ष २०२५–२६चे 'वार्षिक स्नेहसंमेलन' अत्यंत उत्साहात आणि दिमाखात झाले. या दोन दिवसीय सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविधांगी कलागुणांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

शाळेचे उपाध्यक्ष नितीन जिंदाल यांनी आपल्या संबोधनातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. शाळेचा 'वार्षिक अहवाल' सादर करण्यात आला. विशेष नैपुण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले.

या सोहळ्यासाठी पालक, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी दाखवलेली शिस्त आणि कलागुणांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी **सौ. रमा रमेश इदनानी आणि श्री. रमेश लिलाराम इदनानी** यांचे मालकीची खालील वर्णनाची रहीवासी सदनीका खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे– खारघर, ता. पनवेल, पनवेल, जि. रायगड ४१०२१०,** येथील पनवेल महानगरपालीकेच्या हद्दीतील सेक्टर ३५एच मधील प्लॉट क्र. १० वर बांधण्यात आलेल्या **''अरिहंत अभिलाषा''** बिल्डींग, अरिहंत अभिलाषा को. ऑप. हौ.सो. मधील **'ऐ' विंग** मधील, तिसऱ्या मजल्यावरील **रहीवासी सदनीका क्र.३०३,** ज्याचे कार्पेट क्षेत्रफळ ५५.२७ चौ.मी. आहे अशा वर्णनाची मिळकत तिच्या सोबतच्या तदअनुशंगीक शेअर सर्टीफीकेट व खुले वाहनतळ क्र. ६४ इत्यादी सर्व लाभांसह.

तरी सदरहू वर नमुद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काहीही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजाविरहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. ०५/०२/२०२६
स्थान–नवी मुंबई

सही/–
**ॲड. श्रीकांत म. खेरकर**
१२०१, गिरीराज टॉवर, प्लॉट क्र. ५,
सेक्टर २०, रोडपाली, नवी मुंबई ४१०२१८
ई–मेल : shrikant.kherkar@gmail.com

# किशोर जैन यांना नाभिक समाजाचा पाठिंबा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जिल्हा परिषद गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस–भाजप युतीचे उमेदवार किशोर जैन, नागोठणे पंचायत समिती गणाच्या उमेदवार समृद्धी संतोष कोळी आणि सुकेळी पंचायत समिती गणाच्या उमेदवार योगिता शिद यांना नाभिक समाजाचे मार्गदर्शक दिलीप टके यांच्या नेतृत्वाखाली नागोठणे शहर व विभागातील नाभिक समाज बांधवांनी जाहीर पाठिंबा दर्शवीला आहे. यामुळे नाभिक समाजाच्या पाठिंबामुळे राष्ट्रवादी भाजप उमेदवारांचे पारडे जड झालेले दिसून येत आहे.

MAHAVITARAN

### TENDER NOTICE

Following Tender is invited from Eligible Bidders for Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

| Sr. No. | Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission | Estimated Cost (Rs.) | Amount of EMD (Rs.) | Tender Cost Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tender No. SE/PC/Tech/ 2025-26/T-06 | Tender for the work of repair of transformers distribution boxes under Pen Circle | Dt.07/02/26 To Dt.17/02/26 Bid Submission Date: 17.02.26 upto 22:00 hrs. | Rs. 75,00,000/- | Rs. 75000/- | Rs. 5900/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN

# विकासकामांच्या जोरावर विजय नक्की!

## भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला विश्वास

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर जिल्हा परिषद गटाची व चिरनेर व आवरे पंचायत गणाची निवडणूक ७ फेब्रुवारीला होत आहे. या मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या पुढाकारातून मोठ्या प्रमाणात विकास कामे करण्यात आली आहेत. या विकास कामांच्या जोरावर भारतीय जनता पक्षाचा विजय नक्कीच होईल, असा ठाम विश्वास निवडणूक रिंगणात उभ्या असलेल्या उमेदवारांबरोबरच येथील कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.



चिरनेर जिल्हा परिषद व चिरनेर पंचायत गणाच्या निवडणुकीसाठी भाजपा महा युतीच्या माध्यमातून चिरनेर जिल्हा परिषद गटातून उमेदवार देवेंद्र विनायक पाटील, चिरनेर पंचायत गणातून उमेदवार साक्षी सुजित पाटील, आवरे पंचायत गणातून समिधा निलेश म्हात्रे हे उमेदवार निवडणुकीस सामोरे जात आहेत. दरम्यान, भारतीय जनता पक्षाचे उमेदवार देवेंद्र विनायक पाटील हे उद्योजक असून सामाजिक कार्यातून त्यांनी समाजभान जपले आहे. तर साक्षी पाटील व समिधा म्हात्रे यांना राजकीय वारसा आहे. या निवडणुकीमध्ये येथील मतदार त्यांच्या बाजूने ठाम उभे आहेत.

उरण तालुक्यात विकास कामांचा झंझावात सुरू असून, विकास कामांच्या जोरावर भाजपा महायुतीचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून येतील, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. निवडणूकीच्या राजकीय हालचालींचा वेग पाहता ही निवडणूक जिंकून, भाजपा महायुती बाजी मारणार आहे. असे मत जुन्या अनुभवी कार्यकर्त्यांबरोबर तरुण कार्यकर्ते सुशांत पाटील रमेश फोफेरकर, समीर डुंगीकर, निलेश म्हात्रे, सुधीर पाटील, प्रतीक गोंधळी, सुजित पाटील, धनेश गावंड यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.

# अनधिकृत मदरसा, शेड, बांधकाम उद्ध्वस्त

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली.

या कारवाईत शहाबाज गावात असलेला अनधिकृत दर्गा तोडण्यात आला. रफिक काझी व इतर घर क्र. ३९५,नमुंमपा शाळा क्र.०१ च्या दक्षिणेला बेलापूर गांव से.२० सीबीडी बेलापूर यांनी मदरसा उभारला होता. अनधिकृत बांधकामास नोटीस बजाविण्यात आली होती. त्यावर पालिकेने कारवाई करत मदरसा काढून टाकला. सलिम माजिद याकुब सय्यद घर क्र. ०३९०, से. २० बेलापूर गांव, गणेश आर. तांडेल व इतर, घर क्र. २७९/००५ पोतदार शाळेजवळ करावे गांव से.३६ नवी मुंबई यांना अनधिकृत बांधकामास नोटीस बजाविण्यात आली होती. त्यावर देखील कारवाई करून बांधकाम पाडण्यात आले. तसेच तसेच सनसिटी बिल्डिंग सेक्टर -१५ येथे अनधिकृत पावसाळी शेड उभारुन अतिक्रमण करण्यात आलेले संबधितांनी बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते.

अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण स्वत:हून हटविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन केले होते.

# पिल्लई युनिर्व्हसिटीमध्ये अगं अगं सुनबाई चित्रपटाची टीम



**पनवेल : वार्ताहर**

अलेग्रिया निमित्त पनवेल पिल्लई युनिव्हरसिटी पनवेल येथे गुरुवारी मराठी चित्रपट अगं अगं सुनबाई काय म्हणता सासूबाई चित्रपटाची टीम विध्यार्थ्यांनच्या भेटीला आली होती. अग अग सुनबाई काय म्हणता सासूबाई प्रमोशनचा देखणा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला चित्रपटाचे मुख्य कलाकार प्रार्थना बहिरे, दिग्दर्शक केदार शिंदे आणि निर्मिती सना शिंदे या वेळी उपस्थित होते.

दिग्दर्शक केदार शिंदेने सासू-सुनेच्या या कथेला भावनिक किनार उत्तम दिली आहे. सासू आणि सुनेचे वेगवेगळे पैलू मांडताना त्यांच्यातील नात्याला कुठे तडा जाणार नाही, याची काळजी घेतली आहे. त्यांच्या नात्यातील रुसवे-फुगवे, त्यांच्यातील चढाओढ आणि टोमणे तसेच त्यांच्यातील शाब्दिक संघर्ष मांडताना त्या नात्यातील भावभावना आणि गोडवा जपण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. निर्मिती सावंत, प्रार्थना बेहरे, राजन भिसे, नकुल घाणेकर आदी कलाकारांनी या कथानकाला आपल्या उत्तम अभिनयाची छान जोड दिली आहे.

सासू आणि सुनेतील रुसवे-फुगवे, एकमेकींमधील चढाओढ आणि संघर्ष तसेच भावभावना व हळवे प्रेम त्यांनी सुंदररीत्या सादर केले आहेत. चित्रपट या आधीच सिनेमागृहात हाऊसफुल सुरु असून प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कलाकारांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील आठवणी शेअर केल्या आणि प्रेक्षकांना नक्कीच हा चित्रपट आवडेल असा विश्वास व्यक्त केला.

कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चित्रपटातील गाण्यांवर प्रार्थना बेहरे सह ठेका धरत वातावरण प्रफुलीत केलं. या वेळी पिल्लई महाविद्यालयाच्या संचालक - पीआर, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, डॉ. निवेदिता श्रेयन्स, डॉ. संदीप जोशी, प्राचार्य, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय डॉ. गजानन वाडेर, प्राचार्य, पिल्लई कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय प्राचार्य संदीप जोशी, प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात इयत्ता दहावीचा पालक मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये एस.एस.सी.बोर्ड परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२६ ला प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या पूर्व परीक्षेतील गुणवत्तेचा आढावा घेऊन बोर्ड परीक्षेमध्ये गुणवत्ता वृद्धी व इतर अनुषंगीक बाबींवर विश्लेषणात्मक चर्चा करण्यासाठी विद्यार्थी - शिक्षक - पालक सहविचार सभा अर्थात पालक मेळावा गुरुवारी (दि.५) झाला.



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शक सूचनांन्वये विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी यांच्या उपस्थित संपन्न झालेल्या या पालक मेळाव्यास विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, इयत्ता दहावीचे तिन्ही वर्ग शिक्षक प्रशांत परदेशी,सागर रंधवे व संदीप भोईर आणि इतर शिक्षक,विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. महिला पालकवर्गाची उपस्थिती लक्षणीय होती.

या पालक मेळाव्यास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांनी पालकांना विशेष मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या तर प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनीही अत्यंत महत्त्वपूर्ण सूचना करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी पालकांच्या विशेष प्रयत्नांची आवश्यकता प्रतिपादन केली. लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनीही विद्यार्थी व पालकांना विशेष मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, न्हावे ग्रामपंचायतचे माजी सरपंच हनुमान भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

पालक मेळाव्याचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले तर संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी आभार मानले.

# रिटघर हायस्कूलमध्ये एसएससी आणि एचएससी शुभचिंतन समारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिटघरच्या श्री भैरवदेव विदयालय व लोकनेते श्री रामशेठ ठाकूर उच्च माध्य. विदयालयात एस.एस.सी.व एच.एस.सी. शुभचिंतन समारंभ झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, वाय.टी. देशमुख, रमेश पाटील (माजी उपसरपंच , ग्रु, ग्रा.पं. दुंदरे) तसेच विद्यालयातील स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, सुभाष भोपी, (सरपंच ग्रु,ग्रा.पं. दुंदरे), बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश भोपी, विलास भोपी, वंदना भोपी, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, संजय पाटील, भालचंद्र भोपी, जगन भोपी, गजानन भोपी, दिलीप उलवेकर, जयवंत भोपी, पांडुरंग भोपी, नवनाथ भोपी, कमळाबाई वाघमारे (ग्रा.स.) या उपस्थितांनी प्रतिमा पूजन केले.

विद्यालयातील विद्यार्थिनी स्वागत गीत सादर केले. या नंतर सर्व उपस्थित मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.बी. कारंडे यांनी प्रास्ताविक सादर केले. इयत्ता १० वी ब ची विद्यार्थिनी कु. पूर्वा चौधरी, इ. १२ वी हंसिका सिनारे या विद्यार्थिनी भाषणे केली. तसेच शिक्षक मनोगत एस.व्ही. पाटील व एस.व्ही.म्हात्रे यांनी केले. तसेच उपस्थित मान्यवर संजय पाटील व रमेश पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच इ.१० वी व १२ वी सन २०२४-२५ ,२०२५-२६ च्या विद्यार्थ्यांनी शाळेला भेटवस्तू स्वरुपात प्रिंटर देण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे वाय.टी. देशमुख साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित पाटील तसेच आभार गावंड मॅडम यांनी केले. शेवटी वंदे मातरम घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# नवीन पनवेल येथे संत नरहरी महाराजांची ७४०वी पुण्यतिथी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळातर्फे बुधवारी (दि.४) संत नरहरी सोनार महाराज यांच्या ७४०व्यापुण्यतिथीचे आयोजन नवीन पनवेल येथे करण्यात आले होते.

मंडळाचे सचिव विजय भामरे यांच्या हस्ते संत नरहरी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण करण्यात आले. मंडळाचे सचिव विजयजी भामरे यांनी संत नरहरी महाराज यांच्या जीवन चरित्र विषयी माहिती सांगितली.

या वेळी ज्येष्ठ सदस्या सुमन मधुकर रणधीर, सहसचिव मनोज दुर्गादास सोनार, सदस्य योगेश रणधीर, पाडुरंग सोनार, रमेश रामदासशेठ सोनार (विसपुते), कैलास पिंगळे, सुवर्णा कैलास पिंगळे, डॉ. अनिता उदय विभांडिक आदी समाज बंधुभगिनींची उपस्थिती होती. तसेच पुणे येथून श्री रविंद्र बंडूशेठ अहिरराव यांची विशेष उपस्थिती होती.

श्री संत नरहरी महाराजांविषयावर थोडक्यात माहिती सांगितली. तसेच शासन दरबारी संत नरहरी महाराजांची पुण्यतिथी साजरी व्हावी, अशी एकमुखाने मागणी करण्यात आली. प्रास्ताविक सहसचिव मनोज सोनार यांनी केले तर उपस्थितांचे आभार पांडुरंग सोनार यांच्या मानले.

# प्रवीण बोपुलकरांच्या 'वाळन' कथासंग्रहाचे प्रकाशन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लेखक प्रवीण बोपुलकर यांच्या 'वाळन' या कथासंग्रहाचे प्रकाशन आंध्र कला समितीच्या साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. राजेंद्र माने यांनी भूषविले. कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा. प्रतिभा सराफ यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी रोहिदास पोटे (माजी शिक्षण सहसंचालक, महाराष्ट्र शासन) तसेच संदीप राक्षे (लेखक तथा सामाजिक कार्यकर्ते) यांची विशेष उपस्थिती लाभली.

'वाळन' या कथासंग्रहामध्ये ग्रामीण व शहरी जीवनातील वास्तव, माणसांच्या भावना, संघर्ष, नातेसंबंध आणि सामाजिक जाणिवांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे.



कार्यक्रमात लेखक प्रवीण ज. बोपुलकर यांनी आपल्या लेखनप्रवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. या कथासंग्रहाचे प्रकाशन सर्जनशील पब्लिकेशन मार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी अतकरे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. याप्रसंगी निमंत्रितांच्या कविसंमेलनाचे अध्यक्षपद ज्योत्स्ना राजपूत यांनी भूषवले. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून उपस्थित असलेल्या कवींनी कवी संमेलन अधिक उंचीवर नेले. सह सचिव रामदास गायधने, रायगड महिला संघटन प्रमुख माधवी मोतलिंग व केंद्रीय प्रसिद्धी प्रमुख विलास पुंडले यांच्या संयोजनातून प्रकाशन सोहळा उत्साही वातावरणात यशस्वीपणे पार पडला.

# प्रा. वृषाली मगदूम यांना डॉ. भोळे सामाजिक पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

यशवंतराव दाते स्मृती संस्थेतर्फे आयोजित ज्येष्ठ विचारवंत डॉ. भा ल भोळे व डॉ. यशवंत सुमंत स्मृती सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार नुकताच वर्धा येथील बजाज सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत डॉ. अभय बंग यांच्या हस्ते ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा वृषाली मगदूम यांना प्रदान करण्यात आला.



सन्मानचिन्ह, मानपत्र,शाल व रोख वीस हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप होते या समारंभात महाराष्ट्रातील चार सन्मानार्थींना देण्यात आले. यात दीपक गायकवाड, पुणे(वैचारिक लेखन) डॉ. देवकुमार अहिरे पुणे (संशोधन (युवा), आणि डॉ नागोराव, लातूर (जीवन गौरव) यांना प्रदान करण्यात आले. डॉ अभय बंग यांनी विनोबा भावे यांच्या साहित्यातील चिरंतनत्व लक्षात घेता महाराष्ट्रात ज्ञानोबा तुकोबा आणि विनोबा अशी थोर साहित्य संस्कृती परंपरा लाभली आहे असे आपल्या भाषणात प्रतिपादन केले. वृषाली मगदूम यांनी आपल्या मनोगतात लोकशाही आणि संविधान धोक्यात असताना समाजातील शेवटच्या घटकातील कचरा वेचणाऱ्या महिलांचं दारिद्र्य संपलं नाही पण त्या वैचारिकदृष्ट्या अधिक सजग आणि कणखर झाल्या आहेत असं निरीक्षण नोंदवलं.

या वेळी राज्य ग्रंथालय संघ मुंबईचे अध्यक्ष गजानन कोटेवार यानाही सन्मानित करण्यात आले.

# वरद गावंडचे जलरंगामधील चित्र बेळगावच्या प्रदर्शनात



**उरण : बातमीदार**

बेळगाव कर्नाटक येथील के. बी. कुलकर्णी स्मृती दिनानिमित्ताने २०२६ चित्रकला प्रदर्शनामध्ये देवरुख कॉलेज ऑफ फाईन आर्टचा विद्यार्थी तथा उरण तालुक्याचे सुपुत्र वरद विलास गावंड याने काढलेले 'शांततेच्या प्रवासात' हे जलरंग चित्र निवडण्यात आले आहे.

हे चित्र संधिप्रकाशातील समुद्राची संथ आणि शांत अवस्था अचूकपणे टिपते. निळ्या रंगाचे शीड असलेले एक छोटे जहाज संथ लाटांवर विसावले असून, ते समुद्राच्या शीतल छटांशी एकरूप झाले आहे. आकाशात रंगांची जणू एक मैफलच भरली आहे-गर्द निळा रंग हळूहळू गडद केशरी आणि कोमल पिवळ्या रंगात मिसळत मावळत्या सूर्याचे सात्विक सौंदर्य प्रतिबिंबित करत आहे. क्षितिजावर पक्ष्यांचे थवे मुक्तपणे विहार करत असून ते स्वातंत्र्याची जाणीव करून देतात. ही कलाकृती एकांत आणि निसर्ग अन् मानवाच्या चिरंतन नात्याचे दर्शन घडवते. हे चित्र १५ बाय २१ इंच आकाराच्या कागदावर जलरंग माध्यमात साकारले आहे.

हे प्रदर्शन बेळगाव येथील वररेकर नाट्य संघाच्या के. बी. कुलकर्णी आर्ट गॅलरीत ४ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पहावयास मिळेल. वरदच्या या यशामागे कॉलेजच्या प्राचार्य आणि प्राध्यापक वर्गाचे लाभलेले बहुमोल मार्गदर्शन आणि प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले आहे.

कॉलेजचे संस्थापक अजय पित्रे, कला कॉलेजचे प्राचार्य रणजीत मराठे सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : शेकापचे चिपळे गावचे भगवान सीताराम पाटील व त्यांची पत्नी माजी ग्रामपंचायत सदस्य शिला पाटील तसेच इतरांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांची त्यांचे पक्षात स्वागत केले. सोबत अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते.**

# माथेरानमध्ये १० फेब्रुवारीपासून ई-रिक्षा व हातरिक्षा बेमुदत बंद

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये ई-रिक्षा व हातरिक्षा संदर्भातील सुप्रीम कोर्टाच्या स्पष्ट आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने श्रमिक रिक्षा संघटनेने मंगळवार, दि.१० फेब्रुवारीपासून ई-रिक्षा व हातरिक्षा बेमुदत बंद ठेवण्याचा कठोर निर्णय घेतला आहे, मात्र या बंद काळात विद्यार्थ्यांना शाळेसाठी व रुग्णांना रुग्णालयात जाण्यासाठी रिक्षा सेवा सुरू राहणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

श्रमिक संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, नजीब महाबळे व रुपेश गायकवाड यांनी बंदबाबत नगरपालिकेत, अधीक्षक कार्यालयात व पोलीस ठाण्यात निवेदन दिले आहे.

सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायमूर्ती भूषण गवई यांनी ६ ऑगस्ट २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार हातरिक्षा ही अमानवीय प्रथा असल्याचे स्पष्ट करत माथेरानमधील सर्व ९४ हातरिक्षा सहा महिन्यांत कायमस्वरूपी बंद



करून त्या चालकांचे ई-रिक्षाद्वारे पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले होते. यासाठी ई-रिक्षा शासनाने खरेदी कराव्यात, असेही आदेशात नमूद आहे. ६ फेब्रुवारी रोजी सहा महिन्यांची मुदत पूर्ण होत असतानाही प्रशासन व संबंधित यंत्रणांकडून ई-रिक्षा पुरवठा, चार्जिंग पॉइंट उभारणी किंवा प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत ठोस पाऊल उचलले गेले नाही.

या दरम्यान संघटनेने सनियंत्रण समितीशी चर्चा केली. आमदार महेंद्र थोरवे, प्रांताधिकारी, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आदेशाच्या अंमलबजावणीची मागणी केली. जिल्हाधिकारी व सनियंत्रण समितीचे अध्यक्ष के.पी. बक्षी यांच्यासोबत चर्चा होऊनही ई-रिक्षा तत्काळ खरेदी व सुरू करण्याची प्रक्रिया अद्याप कागदावरच अडकलेली आहे. परिणामी रिक्षांची कमतरता, नागरिकांची तासन्तास प्रतीक्षा ही परिस्थिती कायम आहे.

संघटनेने ठाम शब्दांत सांगितले की, हा बंद कोर्टाचा अपमान करण्यासाठी नाही, तर कोर्टाच्या आदेशाकडे भीती न बाळगणाऱ्या वेळकाढूपणा करणाऱ्या आणि आपली जबाबदारी झटकणाऱ्या यंत्रणांना जागे करण्यासाठी आहे. माथेरानच्या मूलभूत सुविधा मिळवण्यासाठी वारंवार कोर्ट कचेरी, मॉनिटरिंग कमिटीपर्यंत धाव घ्यावी लागते. आदेश मिळूनही शेवटच्या दिवसापर्यंत फाईल काही केल्या हलत नाही, ही प्रशासकीय बेफिकिरी असह्य आहे.

बंद काळात विद्यार्थी व रुग्णांसाठी सेवा सुरू ठेवली जाणार असल्याने नागरिकांनी वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन श्रमिक रिक्षा संघटनेने केले आहे.

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत स्व. अजितदादांचे योगदान

## खासदार सुनील तटकरे यांचे उद्गार



**माणगाव : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री स्व. अजितदाद पवार यांच्या समवेत वाटचाल करीत असताना विकासाची वाटचाल तर केलीच, परंतु विचाराची देवाण-घेवाणदेखील केली. महाराष्ट्राच्या जडणघडणीत दादांचे मोठे योगदान असून हे आपल्याला कदापि विसरता येणार नाही. आदितीला त्यांनी मुलीप्रमाणे प्रेम दिले. त्यांची आठवण कायम स्मरणार्थ राहील, असे भावनिक उद्गार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी काढले. ते इंदापूर येथे जाहीर सभेत बोलत होते.

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने माणगाव तालुक्यातील तळाशेत जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार दिशा दीपक जाधव व पंचायत समिती गणातील उमेदवार मनीषा संदेश मालोरे यांच्या प्रचारार्थ जाहीर प्रचार सभा बुधवारी इंदापूर येथे झाली. या सभेला खासदार सुनील तटकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या ७ फेब्रुवारीला होणाऱ्या निवडणुकीत स्व. अजितदादा पवार यांच्या चरणी विजय समर्पित करायचा असेल, तर आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तळाशेत गटातील उमेदवार दिशा दीपक जाधव व पंचायत समिती गणातील उमेदवार मनीषा संदेश मालोरे यांना प्रचंड मतांनी निवडून द्या, असे भावनिक आवाहन खासदार सुनील तटकरे यांनी केले.

सभेला राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शेखर देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुकाध्यक्ष काका नवगणे, पक्षाचे प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश मालोरे, जिल्हा उपाध्यक्ष उदय अधिकारी, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, उपनगराध्यक्ष रिया उभारे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, नगरसेविका लक्ष्मी हिलम, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, महिला आघाडी तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव, उमेदवार दिशा जाधव, उमेदवार मनीषा मालोरे, सुमित काळे, नितीन वाढवळ, संगीता चव्हाण, बाळा खातू, मेघनाथ सातपुते, शुक्रदास मोरे, मनोज जैन, शामराव येलकर, समीर मेहता, मनोज जैन, ऋषिकेश जैन, मिलिंद खानविलकर, सतीश पवार, महेश महाजन, संतोष यादव आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विरोधक काय बोलतायत त्याकडे लक्ष देऊ नका. अहंकार हा जास्त काळ टिकत नसतो. जनताच विरोधकांचा अहंकार मोडून काढेल. ४० वर्षांच्या माझ्या राजकीय जीवनात आपण सर्वांनी मला भरपूर पाठबळ दिले. या विभागातील एकही गाव, वाडी, वस्ती अशी नसेल ज्या ठिकाणी आपले विकासकाम नाही. विकासाच्या जोरावर आपले दोन्ही उमेदवार निवडून येतील असे सांगत रायगड जिल्हा परिषदेवर आपल्या विचारांची सत्ता येऊन माणगाव पंचायत समितीवर राष्ट्रवादीचा झेंडा फडकेल, असा विश्वास खासदार तटकरे यांनी व्यक्त केला.

तालुकाध्यक्ष काका नवगणे यांनी व प्रदेश युवक सचिव दीपक जाधव यांनी या वेळी बोलताना खासदार सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून या विभागात झालेल्या विकासकामांमुळे आपले दोन्ही उमेदवार मोठ्या फरकाने विजयी होतील, असे म्हटले. या सभेत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# युवा धोरण अंतर्गत पुरस्कारासाठी आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्याचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ करिता जिल्हास्तरावरील युवा पुरस्कारासाठी जास्तीत जास्त युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांनी २८ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड प्रकाश वाघ यांनी केले आहे.

हा पुरस्कार हा गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम रु.१००००/- (प्रती युवक व युवतींसाठी) तर प्रती संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम रुपये ५०,०००/- अशा स्वरुपाचा असेल. अर्जदार युवक-युवतीचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रिल रोजी १३ वर्षे पूर्ण व ३१ मार्च रोजी ३५ वर्षे पूर्ण असावे. अर्जदाराचे वास्तव्य किमान पाच वर्षे जिल्ह्यात असणे आवश्यक आहे.

पुरस्काराच्या मुल्यांकनासाठी युवा पुरस्कारासाठी युवा व युवा संस्थांनी केलेले कार्य हे १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीतील किमान गत तीन वर्षांची केलेली कार्य कामगिरी विचारात घेतली जाईल. यामध्ये समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती, जमाती व जनताजी आदिवासी भाग इ.बाबतचे कार्य तसेच शिक्षण, प्रौढ शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण सांस्कृतिक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला सक्षमीकरण, श्रीभुण, व्यसनमुक्ती तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य, राष्ट्रीय एकात्मतेस प्रोत्साहन देणारे कार्य याव्यतिरिक्त नागरी गलिच्छ वस्ती सुधारणा, झोपडपट्टी, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्या, महिला सक्षमीकरण इ. बाबत कार्य, साहस बाबत कार्य विचारात घेतले जाईल.

या युवा पुरस्कारासाठीचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल नेहुली संगम, अलिबाग येथून प्राप्त करुन घेऊन दि.२८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सादर करावेत तसेच अधिक माहीतीसाठी ८३६९६४३५०२, ७७३८०५१५०२, ९९६७२७७०८२ (नीळकंठ आखाडे) या क्रमांकावर सपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागोठण्यात शिवसेनेला धक्का; मनोहर सुटे राष्ट्रवादीत

**नागोठणे : बातमीदार**

ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत शिवसेनेला नागोठणे परिसरात राजकीय धक्का बसला असून ऐनघर विभागातील मनोहर सुटे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीचे नेते, नागोठणे जिल्हा परिषद गटाचे उमेदवार किशोर जैन यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत राष्ट्रवादीला याचा मोठा फायदा होणार असल्याची चर्चा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारधारेवर विश्वास ठेवून तसेच प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकर, मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर प्रभावित होऊन हा निर्णय घेतल्याचे मनोहर सुटे यांनी या वेळी सांगितले.

पक्षप्रवेश कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिलीप टके, शिवराम शिंदे, हरीश काळे, सुकेळी पंचायत समिती गणातील उमेदवार योगिता शीद, बाळासाहेब टके, डॉ. मिलिंद धात्रक, भाजप नेते सोपान जांबेकर, अनंत वाघ, गणपत म्हात्रे, संजय भोसले, संजय काकडे, संतोष लाड, भगवान शीद यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्याने प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन यांनी पक्षात स्वागत करून आगामी काळात नागोठणे परिसरात पक्षसंघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला.




# मोर्बा जि.प. गटात राष्ट्रवादीच्या उमेदवारांचा प्रचार

**माणगाव : प्रतिनिधी**

मोर्बा जिल्हा परिषद गटात आमचे नेते खासदार सुनील तटकरे आणि राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून भरपूर विकासाची कामे झाली असून या विकासाच्या मुद्यावरच आम्ही या निवडणुकीला सामोरे जात आहोत. आमचे मोर्बा जिल्हा परिषद गटाचे उमेदवार अस्लम इब्राहिम राऊत व पंचायत समिती गणाचे उमेदवार अलका सुभाष केकाणे हे दोन्ही उमेदवार तसेच माणगाव तालुक्यातील चारही जिल्हा परिषद गटातील व पंचायत समिती गणातील उमेदवार मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास राष्ट्रवादीचे श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे अल्पसंख्याक सेल अध्यक्ष अल्ताफ धनसे यांनी मोर्बा गावात प्रचार रॅलीदरम्यान व्यक्त केला.



७ फेब्रुवारीला रायगड जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक होत असून प्रचाराची मुदत संपण्यापूर्वी सर्व उमेदवारांनी घर टू घर प्रचारावर अधिक भर दिलेला दिसून आला. या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना मोर्बा सरपंच शौकत रोहेकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तटकरेसाहेबांच्या विकासकामांतून आम्ही अस्लम राऊत व अलका केकाणे या आमच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती गणातून उमेदवार आहेत. नक्कीच मोर्बा गणातून पंचायत समिती भरभरून त्यांना आम्ही मतदान करणार आहोत. मोर्बा शहर अडीच हजारांचे मताधिक्य अस्लमभाई व अलकाताईंना देईल.


मोर्बा पं. स. गणाच्या उमेदवार अलका केकाणे म्हणाल्या की, विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक आम्ही लढत असून आमचा विजय निश्चित आहे.

# फणसाड अभयारण्यात पक्षीगणना पूर्ण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांच्या वतीने एसबीआय फाउंडेशनच्या शाश्वत सहभाग, पुनर्स्थापना आणि वन्यजीव संरक्षणाच्या माध्यमातून संवर्धन कार्यक्रमांतर्गत आणि महाराष्ट्र वन विभागाच्या ठाणे वन्यजीव विभागाच्या सहकार्याने राबविण्यात येणारी दीर्घकालीन नागरिक विज्ञानावर आधारित पक्षी निरीक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत पक्षीगणना झाली.

पक्षीगणना ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान वैज्ञानिक पद्धतीने राबविण्यात आली. यात ३६ पक्षी निरीक्षक, ग्रीन वर्क्स ट्रस्टचे १८ स्वयंसेवक आणि फणसाड वन्यजीव अभयारण्याचे १८ वन कर्मचारी सहभागी झाले होते. हा उपक्रम उपवनसंरक्षक वन्यजीव ठाणे राहुल गवई, मनोहर दिवेकर (सहाय्यक वनसंरक्षक, फणसाड



वन्यजीव अभयारण्य) आणि नितीन ढगे (क्षेत्र वन अधिकारी, फणसाड) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या उपक्रमासाठी १३ राज्ये व नेदरलँड्स येथून एकूण १३१ नोंदण्या प्राप्त झाल्या असून त्यातून महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, ओडिशा व नेदरलँड्स येथील ४० सहभागी पक्षी गणक हे आयटी, कला, शिक्षण, शासकीय सेवा, वैद्यकीय, कायदा आणि विद्यार्थी अशा विविध क्षेत्रांतून निवडण्यात आले होते.

१३ पथकांनी (प्रत्येकात तीन पक्षी निरीक्षक, एक स्वयंसेवक व एक वनरक्षक) फणसाड वन्यजीव अभयारण्याच्या आत व आसपासच्या विविध अधिवासांतील २६ ठिकाणी भेट देऊन लाइन ट्रान्सेक्ट पद्धतीने जंगल, पठारे व ओढ्यांमधून चालत पक्षी गणना केली तसेच फुलपाखरे, सस्तन प्राणी, सरपटणारे व उभयचर प्राणी यांचीही नोंद केली. या गणनेपूर्वी सहभागींसाठी डॉ. निखिल भोपाळे व सर्वेश अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली होती. संकलित माहितीची काटेकोर पडताळणी छायाचित्रे, आवाज नोंदी व प्रश्नोत्तरांद्वारे करण्यात आली.

तीन दिवसांच्या गणनेनंतर प्राथमिक निष्कर्षानुसार हिवाळी गणनेत ५५ कुळांमधील १५९ पक्षी प्रजाती, सहा कुळांमधील ४१ फुलपाखरांच्या प्रजाती, १३ कुळांमधील २१ सस्तन प्राणी, नऊ कुळांमधील २१ सरपटणारे प्राणी (११ साप व १० सरडे) आणि पाच कुळांमधील आठ उभयचर प्रजाती नोंदविण्यात आल्या. यामध्ये दोन निकट असुरक्षित, दोन नजिकच्या काळात धोक्यात येऊ शकणारी प्रजाती २६ अनुसूची १ व १३१ अनुसूची २ प्रजाती, १३ भारतातील स्थानिक व सात पश्चिम घाटातील स्थानिक पक्षी, ड्रॉन्गोच्या सर्व सहा प्रजाती, चारपैकी तीन नाइटजार, फुलपिकरच्या सर्व तीन प्रजाती तसेच श्रीलंका फ्रॉगमाउथ, बार-विंग्ड फ्लायकॅचर-श्राईक, ब्ल्यू-थ्रोटेड फ्लायकॅचर व मॉटल्ड वूड-आउल यांसारख्या विशेष पक्ष्यांचा समावेश आहे.

# कर्जत येथून शिर्डीकडे निघाली पायी दिंडी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथून श्री क्षेत्र शिर्डी अशी पायी दिंडी निघाली असून आज कर्जत शहरातील श्री दत्त मंदिर येथून या दिंडीचे प्रस्थान झाले. यावर्षी दिंडीचे हे नववे वर्षे असून कर्जत ते शिर्डी हा पायी प्रवास शहर आणि परिसरातील दोनशे तरुण सहभागी झाले असून ही दिंडी ८ फेब्रुवारी रोजी श्री साई क्षेत्र शिर्डीमध्ये पोहोचणार आहे.

कर्जत शहरातील श्री साई मित्र मंडळाच्या वतीने कर्जत ते श्री क्षेत्र शिर्डी अशी पायी पालखी काढली जाते. कर्जत शहरातील श्री दत्त मंदिर येथे विधिवत पूजा करून ही पायी पालखी कर्जत शहरातून शिर्डीकडे रवाना झाली. दररोज साधारण तीस किलोमिटर अंतर पार करीत ही दिंडी शिर्डी येथे निघाली. पहिला मुक्काम कर्जत तालुक्यातील वारे गावी असून पायी दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी स्थानिक साई भक्त यांच्याकडून व्यवस्था केली जात असते. त्याचवेळी सकाळची न्याहारी आणि दुपारचे भोजन आणि रात्रीचे भोजन साठी अनेक साई भक्त गेली अनेक वर्षे ओम साई मंडळाच्या बरोबर असतात. या पायी पालखीमध्ये साईबाबा व त्यांच्या सहकाऱ्यांची वेशभूषा असलेले तरुण आकर्षण ठरत आहेत. उद्या ८ फेब्रुवारी



रोजी ही पालखी शिर्डी येथे पोहचणार आहे.

पायी वारीमध्ये चालणारे साई भक्तांना कोणताही धोका होऊ नये यासाठी आयोजक मंडळाचे वतीने ग्रुप इन्शुरन्स उतरविण्यात आला आहे. त्या आधारे जखमी आणि अपघात कवच देण्यात आले असून पाच लाखाचे विमा कवच पालखी सोबत चालणारे सर्व साईभक्तांसाठी आहे.

# आरसीबी संघ डब्ल्यूपीएल विजेता

## दुसऱ्यांदा उंचावली ट्रॉफी; दिल्लीची पुन्हा हार

**वडोदरा : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) थरारक अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने दिल्ली कॅपिटल्सचा सहा गडी राखून पराभव करत दुसऱ्यांदा जेतेपदावर आपले नाव कोरले. कर्णधार स्मृती मानधना आणि जॉर्जिया व्हॉल यांची धडाकेबाज अर्धशतकी खेळी आरसीबीच्या ऐतिहासिक विजयाच्या शिल्पकार ठरल्या.



दिल्लीने विजयासाठी दिलेल्या २०३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात खराब झाली होती. ग्रेस हॅरिस अवघ्या नऊ धावांवर बाद झाली, मात्र त्यानंतर कर्णधार स्मृती मंधाना आणि जॉर्जिया व्हॉल या जोडीने दिल्लीच्या गोलंदाजांची पिसे काढली.

या दोन्ही फलंदाजांनी दुसऱ्या विकेटसाठी १६५ धावांची विक्रमी भागीदारी रचली, जी डब्ल्यूपीएल इतिहासातील कोणत्याही विकेटसाठीची सर्वोच्च भागीदारी ठरली आहे. या भागीदारीने दिल्लीला सामन्यातून पूर्णपणे बाहेर फेकले.

सामना संपत आला असताना जॉर्जिया व्हॉल (५४ चेंडूत १४ चौकारांसह ७९ धावा), रिचा घोष (६) आणि स्मृती मंधाना (४१ चेंडूत १२ चौकार व तीन षटकारांसह ८७ धावा) पाठोपाठ बाद झाल्याने थोडी धाकधूक वाढली होती, मात्र नॅडिन डी क्लर्क आणि राधा यादव यांनी आरसीबीला विजयाचा गुलाल उधळायला लावला. राधाने पाच चेंडूत १२ धावा कुटून १९.४ षटकातच विजयावर शिक्कामोर्तब केले.

दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना दमदार धावसंख्या उभारली होती, मात्र आरसीबीच्या आक्रमणापुढे त्यांची गोलंदाजी निष्प्रभ ठरली. चिनेल हेन्रीने दोन बळी टिपले, पण ती संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. दिल्लीचा हा सलग चौथा अंतिम फेरीतील पराभव ठरला.

डब्ल्यूपीएलच्या इतिहासात पहिल्यांदा फायनलची लढाई २०० पार धावसंख्येची झाली. आतापर्यंतच्या या लीगच्या इतिहासात थेट फायनल गाठणारा संघ कधीच ट्रॉफी जिंकला नव्हता. त्यामुळे यंदाच्या हंगामात दिल्ली कॅपिटल्सचा संघ जेमिमा रॉड्रिग्जच्या नेतृत्वाखाली फायनलमधील पराभवाची मालिका खंडीत करत ट्रॉफीवर नाव कोरेल, असे वाटत होते, पण आरसीबीने इतिहास बदलला. एलिमिनेटरमधून फायनल गाठणाऱ्या दिल्लीने दिलेल्या विक्रमी धावसंख्येचा आरसीबीने यशस्वी पाठलाग करून दाखवला.



# राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रोनक जितेकरला सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात अकरावी विज्ञान विभागात शिक्षण घेणाऱ्या रोनक रोशन जितेकर या विद्यार्थ्याने राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत १०५ किलो वजनी गटातील पॉवरलिफ्टिंग क्रीडाप्रकारात सुवर्णपदक पटकाविले. यासोबतच राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून निवड झाली आहे.

रोनकच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, जे.एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याचबरोबर उपप्राचार्य डॉ. रमेश म्हात्रे, डॉ. लक्ष्मण गवळी, जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या इन्चार्ज प्रा. सुनिता काटकर (विज्ञान), प्रा. ललिता अवचिते (कला) व प्रा. सतीश ढगे (वाणिज्य), क्रीडा शिक्षक संभाजी बढे व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी रोनकचे कौतुक केले.

# वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रम

## अंडर-१९ वर्ल्डकप अंतिम सामन्यात षटकारांची बरसात




**हरारे : वृत्तसंस्था**

भारताचा १४ वर्षीय क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशीची अंडर-१९ विश्वचषकात बॅट तळपली आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील अंतिम सामन्यात वैभवने दमदार शतक पूर्ण केले. या सामन्यात त्याने ८० चेंडूत १५ चौकार व १५ षटकारांच्या मदतीने १७५ धावांची वादळी खेळी केली. यासह वैभवने अंडर-१९ विश्वचषकात सर्वाधिक षटकारांचा विक्रम केला आहे.

या सामन्यापूर्वी वैभव सूर्यवंशीने २०२६च्या १९ वर्षांखालील विश्वचषकात १६ षटकार मारले होते आणि एका १९ वर्षांखालील विश्वचषक आवृत्तीत सर्वाधिक षटकार मारणारा तो इतिहासातील दुसरा खेळाडू बनला होता. आता अंतिम सामन्यातील खेळीत त्याने १५ षटकार लगावत एका खेळीत सर्वाधिक षटकार लगावण्याचा विश्वविक्रम केला आहे.

वैभवने आता युवा एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक षटकार लगावले आहेत. त्याने डिसेंबरमध्ये दुबई येथे युएई अंडर-१९विरुद्ध स्वतःचा सर्वाधिक १४ षटकारांचा विक्रम मागे टाकला आहे.

# ऑस्ट्रेलियाला धक्का! हेजलवूड वर्ल्डकप स्पर्धेबाहेर

**सिडनी : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेचा थरार शनिवार (दि. ७)पासून सुरू होत आहे. या क्रिकेट महाकुंभाच्या सुरुवातीपूर्वीच ऑस्ट्रेलियन संघाला मोठा हादरा बसला आहे. संघाचा अनुभवी आणि दिग्गज वेगवान गोलंदाज जोश हेजलवूड दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने (सीए) याबाबत अधिकृतपणे माहिती दिली.



विश्वचषकाचा पहिला सामना सुरू होण्यास काही तास शिल्लक असतानाच ऑस्ट्रेलियाच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले आहे. जोश हेजलवूड गेल्या काही काळापासून दुखापतीशी झुंज देत होता. तो सुपर-८ फेरीपर्यंत तंदुरुस्त होईल, अशी आशा निवड समितीला होती, परंतु त्याच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने अखेर त्याला स्पर्धेला मुकावे लागले आहे.

ऑस्ट्रेलियाची डोकेदुखी वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे, काही दिवसांपूर्वीच त्यांचा कसोटी कर्णधार आणि अव्वल वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स यानेही दुखापतीमुळे स्पर्धेतून माघार घेतली आहे. आता हेजलवूडही बाहेर गेल्याने ऑस्ट्रेलियाची वेगवान गोलंदाजीची धार कमी झाली असून संघाच्या आक्रमणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पर्यायी खेळाडूची घोषणा लवकरच

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने अद्याप हेजलवूडच्या जागी अधिकृतपणे कोणत्याही खेळाडूचे नाव जाहीर केलेले नाही. ऑस्ट्रेलियाचा पहिला सामना उशिराने असल्याने त्यांच्याकडे पुरेसा वेळ उपलब्ध आहे. सूत्रांच्या माहितीनुसार राखीव खेळाडू म्हणून संघात असलेला सीन एबॉट याला मुख्य संघात स्थान मिळण्याची दाट शक्यता आहे. एबॉट नुकत्याच झालेल्या पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेतही संघाचा भाग होता.

# हर्षित राणा ‘आऊट’, मोहम्मद सिराज ‘इन’!



**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. भारतीय संघ ७ फेब्रुवारीला आपला पहिला सामना अमेरिकेविरूद्ध खेळणार आहे. या सामन्याला सुरूवात होण्याआधीच भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. संघातील वेगवान गोलंदाज हर्षित राणा दुखापतीमुळे या स्पर्धेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी मोहम्मद सिराजचा भारतीय संघात समावेश करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या सराव सामन्यादरम्यान राणा दुखापतग्रस्त झाला होता. त्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले होते. या सामन्यात गोलंदाजी करत असताना तो दोन वेळा थांबला, त्यानंतर त्याने आपल्या गुडघ्याला हात लावला. त्यानंतर तो मैदान सोडून बाहेर गेला. राणा वर्ल्डकप संघातून बाहेर गेल्यानंतर मोहम्मद सिराजला संघात स्थान दिले जाणार आहे.

# दिल्लीच्या पराभवानंतरही कर्णधार जेमिमाकडून खेळाडूंचे कौतुक




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्सने यंदा सलग चौथ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला होता, मात्र या वेळीही दिल्ली संघाला रिकाम्या हाती परतावे लागले आहे. संघाचा कर्णधार बदलला, पण नशीब काही बदलले नाही. अंतिम फेरीत आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या उभारूनही दिल्लीला सहा गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान, सामन्यानंतर संघाची कर्णधार जेमिमा रॉड्रिग्जने खेळाडूंचे तोंडभरून कौतुक केले.

सामन्यानंतर बोलताना जेमिमा रॉड्रिग्ज म्हणाली, मला माझ्या संघाचा अभिमान आहे. आमच्यासाठी हे मुळीच सोपे नव्हते, पण आमच्या मुलींनी जो खेळ केला आणि अंतिम फेरीत स्थान मिळवले हे अभिमानास्पद आहे. इतकेच नव्हे, तर सपोर्ट स्टाफमधील सदस्यांनीदेखील प्रचंड मेहनत घेतली. त्यांनी वातावरण चांगले ठेवण्यात मोलाचे योगदान दिले. तुम्ही पाहू शकता की, दिल्ली कॅपिटल्स संघाचे चाहते अजूनही जल्लोष करत आहेत. जगभरातील सर्व दिल्ली कॅपिटल्सच्या चाहत्यांचे मी आभार मानते.

जेमिमा पुढे म्हणाली, अंतिम सामन्यात २०४ हा कधीही उत्तम स्कोअर असतो. आम्ही एक संघ म्हणून जसा खेळ केला, त्यासाठी सर्वांचे आभार. मला तरी हेच वाटते की, एक संघ म्हणून आम्ही उत्तम कामगिरी केली. आम्ही आणखी चांगले करू शकलो असतो, पण सर्वांनी कठोर मेहनत घेतली.

# मैदानाबाहेर असलेल्या युझवेंद्र चहलची ‘बोलंदाजी’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचे अनुभवी स्पिनर युझवेंद्र चहलने एका वृत्तवाहिनीवर बोलताना आपली कारकीर्द, ट्रोलिंग आणि टीम इंडिया याबाबत अनेक गोष्टींचा उलगडा केला आहे. याचबरोबर चहलने आपल्या निवृत्तीबाबतदेखील मोठे वक्तव्य केले.



चहल गेल्या अनेक वर्षांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. त्याने टी-२० वर्ल्डकप २०२४मध्ये भारतीय संघाकडून सहभाग नोंदवला होता, मात्र त्याला या स्पर्धेत एकही सामना खेळायला मिळाला नाही. चहलने ऑगस्ट २०२३मध्ये शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला आहे.

३५ वर्षीय चहलने सांगितले की, सोशल मीडियावरील ट्रोलिंगचा त्याच्यावर फारसा परिणाम होत नाही, मात्र ज्या वेळी लोक कुणा दुसऱ्याचे नाव जोडून वैयक्तिक गोष्टींची चर्चा करतात त्या वेळी वेदन होतात. चहलच्या मते तो अशा गोष्टींना जास्त महत्व देत नाही. त्याचा फोकस हा क्रिकेट खेळण्यावर जास्त असतो.

दरम्यान, दीर्घ काळापासून चहल आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. त्यामुळे त्याच्या निवृत्तीच्या अफवा वेळोवेळी पसरत असतात. त्यावर चहलने तो अजून पाच ते सहा वर्षे क्रिकेट खेळणार असल्याचे सांगितले. त्याच्या मते जोपर्यंत मैदानावर खेळताना आनंद मिळतोय आणि खेळण्याची पॅशन आहे, तोपर्यंत तो क्रिकेट खेळणार आहे.

चहलच्या मते प्रत्येक खेळाडूची वेळ येत जात असते. रोहित शर्मा आणि विराट कोहली टी-२० संघात नसले तरी टीम इंडियाने टी-२० क्रिकेटमध्ये चांगली लय दाखवली आहे. याचे कारण म्हणजे संघात हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह आणि सूर्यकुमार यादव सारखे अनुभवी खेळाडू आहेत. त्यांनी टीमला सांभाळून घेतले आहे.

### टीम इंडियाबद्दलही वक्तव्य

युझवेंद्र चहलने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६बद्दलही मोठे वक्तव्य केले आहे. तो म्हणाला, भारताला फक्त भारतच हरवू शकतो. कोणत्याही दुसऱ्या संघाकडे भारताला हरवण्याची क्षमता नाही. भारतीय संघात अनुभव आणि तरूण खेळाडूंचे योग्य संतुलन आहे. युझीने जसप्रीत बुमराहला जगातील एक नंबरचा वेगवान गोलंदाज असे संबोधले असून हार्दिक पांड्या हा संघातील सर्वात महत्त्वाचा अष्टपैलू खेळाडू असल्याचे मत व्यक्त केले.

# प्रशिक्षक गौतम गंभीरने घेतले सिद्धिविनायकाचे दर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याने मुंबईतील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. भारतीय संघाच्या विजयासाठी आणि खेळाडूंच्या उत्तम आरोग्यासाठी त्याने बाप्पाच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले.



टी-२० विश्वचषकाचे बिगुल वाजले असून भारतीय संघ या मोठ्या स्पर्धेसाठी सज्ज होत आहे. प्रशिक्षक म्हणून गंभीर याच्यावर मोठी जबाबदारी आहे. त्याने गुरुवारी सकाळी सिद्धीविनायक मंदिरात जाऊन विधीवत पूजा केली. या वेळी त्याच्यासोबत काही मोजके सहकारी उपस्थित होते. भारताने २०२४चा टी-२० विश्वचषक जिंकला होता, आता २०२६मध्येही हे जेतेपद राखण्याचे आव्हान टीम इंडियासमोर आहे. ही स्पर्धा भारत आणि श्रीलंकेत संयुक्तपणे आयोजित केली जाणार असल्याने घरच्या मैदानावर जेतेपद मिळवण्याचा विश्वास प्रशिक्षक गंभीरने व्यक्त केला आहे.

गौतम गंभीर हा आपल्या शिस्तबद्ध आणि आक्रमक रणनीतीसाठी ओळखले जातात. प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळल्यापासून त्याने भारतीय संघात अनेक महत्त्वाचे बदल केले आहेत. कोणत्याही मोठ्या कार्याची सुरुवात बाप्पाच्या दर्शनाने करणे ही आपली संस्कृती आहे. टीम इंडियाच्या यशासाठी आणि प्रत्येक भारतीयाच्या स्वप्नपूर्तीसाठी मी आशीर्वाद मागितले आहेत, अशी भावना त्याने दर्शनानंतर व्यक्त केली.

### चाहत्यांची गर्दी, संघाला शुभेच्छा

*गौतम गंभीर मंदिरात आल्याचे समजताच क्रिकेट चाहत्यांनी त्यांना पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यावेळी अनेकांनी ‘चक दे इंडिया’ आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या घोषणा देत भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या. गंभीरनेही चाहत्यांना अभिवादन केले आणि सर्वांच्या प्रेमाबद्दल आभार मानले. भारतीय संघ आता विश्वचषकाच्या तयारीसाठी सराव सत्रात व्यस्त होणार असून गंभीरच्या मार्गदर्शनाखाली टीम इंडिया पुन्हा एकदा जगज्जेतेपदावर नाव कोरण्यासाठी सज्ज झाली आहे.*

# डब्ल्यूपीएल विजेत्या, उपविजेत्या संघाला कोट्यवधींचे बक्षीस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर बंगळुरूने वूमन्स प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)मध्ये दुसऱ्या विजेतेपदाला गवसणी घातली. विजेत्या संघावर बक्षिसांचा वर्षाव झाला आहे.

फायनल जिंकल्यानंतर स्मृतीच्या आरसीबीला तब्बल सहा कोटी रुपयांचा चेक मिळाला आहे. डब्ल्यूपीएल ही लीग आर्थिकदृष्ट्या स्थिर होत असून महिला फ्रेंचायज क्रिकेटमध्ये आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

उपविजेत्या दिल्ली कॅपिटल्सचादेखील खिसा भरला आहे. त्यांना तीन कोटी रुपये मिळाले आहेत. विशेष म्हणजे दिल्ली कॅपिटल्स सलग चौथ्यांदा डब्ल्यूपीएलच्या फायनलमध्ये पोहचली होती. इतर संघांनीही कमाई केली आहे.

# बेल्स खाली पडली, पण राधा नाबाद!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या दिल्ली कॅपिटल्सने २०३ धावांचा डोंगर उभारला होता. त्यामुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसमोर खूप मोठे आव्हान होते. या आव्हानाचा पाठलाग करताना स्मृती मानधना आणि जॉर्जिया वोलने निर्णायक खेळी केली. शेवटी विजयी चौकार मारणाऱ्या राधा यादवच्या शॉटवरून सोशल मीडियावर चर्चा रंगायला सुरुवात झाली आहे.

या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला विजयासाठी शेवटच्या षटकात १० धावांची गरज होती. त्यावेळी राधा यादव दोन चेंडूत तीन आणि नादीन डी क्लार्क सहा धावांवर नाबाद होती. षटकातील सुरवातीच्या दोन्ही चेंडूंवर प्रत्येकी एक धाव आली. त्यानंतर शेवटच्या चार चेंडूंवर आठ धावांची गरज होती. त्यामुळे दिल्लीचे पारडे जड होते, पण तिसऱ्या चेंडूवर राधा यादवने चौकार खेचला.

या चौकारानंतर बंगळुरू संघाला विजयासाठी तीन चेंडूत चार धावांची गरज होती. त्या वेळी राधाने बॅकफूटवर जाऊन एक्स्ट्रा कव्हरच्या वरून कट शॉट खेळून चौकार मारला. शॉट मारताच



स्टंपवर असलेली बेल्स उडून खाली पडली. सर्वांना हेच वाटले की, राधा हिट विकेट झाली आहे, पण बंगळुरू संघातील खेळाडू विजयाचा जल्लोष करण्यासाठी मैदानात धावत आले.

नेमके काय घडलंय हे कोणालाच माहीत नव्हते. रिप्लेमध्ये पाहिले त्या वेळी समजले की, शॉट खेळत असताना बॅट आणि स्टंपचा कुठलाही संपर्क झालेला नाही, तर यष्टिरक्षण करत असलेल्या लिजेल ली हिच्या ग्लोव्हजचा यष्टीला संपर्क झाला. त्यामुळे बेल्स खाली पडली. त्यामुळे राधा यादव नाबाद राहिली आणि बंगळुरू संघाने हा सामना सहा गडी राखून आपल्या नावावर केला. यासह बंगळुरूने दुसऱ्यांदा जेतेपदाचा मान पटकावला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com